**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2583/2007.**

श्री शैलेन्द्रप्रसार महाविरप्रसार शुक्ल क.लि.
जिल्हाधिकारी कार्यालय (संकीर्ण शाखा/स्वा.स.सै.)
गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
2) श्री डी. व्ही. मसराम
जन माहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.11.2007 (16.11.2007 ) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.5.2007 रोजी माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मा.उपआयुक्त (महसूल) नागपूर यांचेकडील पत्र क्र. मशा 7(1)/आस्था–2/सीआर–91/2003 दि. 9.7.2003. माहितीचा कालावधी दि. 1 जानेवारी 1990 ते 1 जानेवारी 1993

1. स्थाई/अस्थाई चतुर्थ श्रेणी यांची 1 जानेवारी 1990 ते 1 जानेवारी 1993

2. शिपाई या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर केलेली पदोन्नतीचे आदेश क्र. कार्या 2/आस्था4/कावि 1035/1990 दि. 30.7.1990 तसेच आदेश क्र. कार्या–2/आस्था4/कावि 142/1992 दि. 17.1.1992 हे आदेश निर्गमीत करण्यापुर्वी तयार केलेली निवडसुचीच्या प्रती.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.5.2007 रोजी शुल्क रु. 60/– अधिक रु. 60/– डाक खर्च असे एकुण 120/– चा अतिरिक्त खर्च भरण्यास कळविले होते असे दिसून येते. व अर्जदाराने सदर रकमेचा भरणा केला असून त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता त्यांनी दि. 2.7.2007 रोजी प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 18.7.2007 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध झाली परंतु निवडसुची उपलब्ध झालेली नाही मात्र सदर अभिलेख कायम ठेवण्याची वस्तुस्थिती नाही. अपिलकर्त्यास सदर विषयीचा अभिलेख हा मानीव दिनांक घेण्याकरीता आवश्यक आहे. परंतु शासकीय नियमाप्रमाणे मानीव दिनांक हा सेवा जेष्ठतेच्या आधारावर दिली जाते. व ज्येष्ठता यादी त्यांना पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी समाधान करुन घेणे आवश्यक आहे. असा निर्णय दिलला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये मानीव दिनांकाची मागणी आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना मार्फत जिल्हाधिकारी भंडारा मार्फत पाठविण्यात आली असून मार्च 2003 पासून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही व त्याकरीता त्यांना निवडसुची यादी हवी आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की निवडसुचीचा शोध घेण्यात आला होता परंतु जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये निवडसुची दिसून येत नाही. असे असले तरी पुन्हा ऐक वेळ हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत निवडसुचीच्या दस्तऐवजाचा शोध हा घेण्यात यावा व शोध कोणकोणत्या शाखेत किंवा अधिकारी, कर्मचारी यांचेकडे घेतला त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेली निवडसुचीची माहितीचा शोध हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत घेवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करुन अपीलकर्ता यांनासुध्दा रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.364–366

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2584/2007 व अपील क्रमांक 2585/2007 .**

श्री अविनाश बृजमोहन बजाज
बजाज नगर, फुलचुर रोड, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त
नगर पालिका प्रशासन नागपूर
2) श्री विजय देशमुख
जन माहिती अधिकारी तथा
मुख्य अधिकारी
नगर परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 2584/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.7.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून नगर परिषद गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. दि. 29 मई 2007 को न.प.गोंदिया कि स्टैंडींग कमेटी कि सभा कि कार्यवाही कि नकल

2. दि. 7 जुलै 2007 को संपन्न हुई जनरल सभा कि कार्यवाही कि नकल

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.9.2007 रोजी देण्यात आलेला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही त्यामुळे मागणी केलेली माहिती निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. नगर परिषद गोंदिया यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करतांना सदर माहिती वेळेच्या आंत माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांना पुरविण्यात आली होती. व त्यानंतर दि. 28.8.2007 रोजी माहिती संबंधाने शुल्क जमा करण्यास पत्र दिले होते असे कार्यालयीन दस्तऐवजावरुन निदर्शनास येते. परंतु ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणलेली नाही. तसेच अर्जदार अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांना सदरचे पत्र दि. 31.8.2007 रोजी मिळाले ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणलेली दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता व प्रभारी मुख्याधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या संदर्भात गंभीर आहेत असे दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना आता सदरची माहिती ही विनामुल्य

उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु या सदरच्या प्रकरणामध्ये मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी योग्य ती चौकशी करुन प्रथम अपीलात किंवा सदरची माहिती विलंबाने देण्याच्या संदर्भात जे कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 2585/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून नगर परिषद गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवेदकने नगर परिषद स लायसंस मिलने बाबत आवेदन दिया था लेकिन आज तक न.प.गोंदिया ने लायसंस नही दिया जिसके कारण सुचना अधिकारी के तहत यह बतलाय गया है कि लायसंस नगर परिषद के अभियंता लोककर्म विभाग में दिनांक 30.4.2007 से प्रकरण प्रलंबित है इस बाबत निचे लिखे अनुसार जानकारी देने कि कपया करे.

अ. नगर परिषद के लोककर्म अभियंता द्वारा यह प्रकरण प्रलंबीत करने का क्या कारण है.

ब. नगर परिषद के लोककर्म अभियंता के पास इस प्रकार के कितने प्रकरण प्रलंबित है.

5. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.8. 2007 रोजी प्रथम अपील दाखल केले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारचे पत्र किंवा माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी सांगितले. परवाना निरीक्षक अजयसिंह उत्तमसिंह यादव यांनी खुलासा करतांना दि. 30.4.2007 ला सदर अर्ज नगर पालिका यांचेकडे तांत्रिक तपासणी करीता सादर करण्यात आली होती तो गैरलागू आहे. विहित मुदतीत माहिती

उपलब्ध करुन दिली नाही हे सिध्द होत असल्यामुळे संबंधित प्रकरणामध्ये जे अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे बाबत चौकशी करुन व अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात चौकशी करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहिल. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. 2584/2007 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.7.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपील क्र. 2585/2007 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 19.7.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) विद्यमान मुख्याधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ज्या कर्मचा–यांनी विलंब केला असेल त्याची चौकशी करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.367–370

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2590/2007.**

श्री राधेशाम परसरामजी काबरा
शिवाजी वार्ड, ब्रम्हपूरी रोड,
मु. पो. ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त
नगर पालिका प्रशासन नागपूर
2) श्री र. वी. पांढरे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्य अधिकारी
नगर परिषद देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. देसाईगंज नगरपरिषदेतील प्रभाग क्र. 1 ते 17 मध्ये निवडूण आलेल्या उमेदवारांनी निवडणूकीच्या खर्चासंबंधीचे अंतीम प्रपत्र मध्ये सादर केलेल्या खर्चाचे विवरणाची सत्यप्रत मिळण्याबाबत.

2. विषयांकीत निवडणूकी निवडूण आलेल्या 1. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) 2. राष्ट्रीवादी कॉंग्रेस (रॉकॉ) 3. भारतीय जनता पार्टी (भाजपा) 4. बहुजन समाज पाटी (बसपा) या राजकीय पक्षांनी त्यांचे पक्षाच्या निवडून आलेल्या उमेदवारावर निवडणूक खर्च केला आहे काय? असल्यास त्यांनी सदर केलेल्या खर्चाची माहिती मिळण्याबाबत.

3. निवडून आलेल्या उमेदवारांनी व त्यांचेशी संबंधीत राष्ट्रीय पक्षांनी निवडणूकीवर झालेल्या खर्चाचे विवरण विहीत मुदतीत केले आहे काय? नसल्यास त्यांचेवर निवडणूक अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हयाची माहिती मिळण्याबाबत.

सदरची माहिती टपालाने घेणार नाही असे नमूद केलेले आहे.

3. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.8. 2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17. 9.2007 रोजी देण्यात आलेला आहे. निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांनी त्यांचे पत्र दिनांक 11.1.2007 अन्वये माहिती सादर करण्यात कळविले होते. त्यानंतर माहिती उपलब्ध करुन उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांना दि. 31.8. 2007 ला पुरविलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली नाही असे सांगितले. त्यानंतर दिनांक 22.3.2007 रोजी देसाईगंज येथील निवडणूकीचा संपूर्ण रेकॉर्ड नगर परिषद देसाईगंज येथे उपलब्ध आहे. तरी नगर परिषद देसाईगंज येथून प्राप्त करुन घ्यावा असे निर्देश असतांना नगर परिषद देसाईगंज कडून अजुनही प्राप्त झाला नाही असे सांगितले. व त्यामुळे अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध झाली

नाही. निर्णय झाल्यापासून 7 दिवसाचे आंत विनामुल्य पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती ही दि. 28.11.2007 रोजी उपलब्ध करुन दिली असली तरी ती अपुर्ण आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या करीता अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेले दिसून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो.

3. अपीलकर्ता यांनी मुळात जी माहिती मागितली आहे ती माहिती निवडणूक अधिकारी देसाईगंज यांचेकडे मागितली आहे व त्यामुळे प्रामुख्यानी निवडणूक अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून ते जबाबदार दिसून येतात. वास्तविक अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक अधिकारी उपविभाग कार्यालय अशी माहिती मागितलेली होती व त्यामुळे सदरची माहिती त्यांनीच देणे आवश्यक होते. नगर परिषदेकडील माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज हस्तांतर करणे हे योग्य नव्हते. व त्यामुळे त्यामुळे त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.12.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 26.12.2006 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित आणि तत्कालीन जन माहिती

अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक अधिकारी देसाईगंज हे जबाबदार असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करुन तीन महिन्याचे आंत आयोगाकडे अहवाल सादर करावा.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.371–374

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2592/2007.**

श्री श्रीकांत गणेश परांजपे
प्लॉट नं. 7, स्वावलंबी नगर
नागपूर 440022 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून शासकीय ग्रंथागार नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
महा. सिव्हील मेडिकल कोड व्हाल्यूम एक या पुस्तकाच्या छायांकित प्रत देण्याबाबत. वर उल्लेख करण्यात आलेले पुस्तक आपल्या विभागात अनेक वर्षापासून उपलबध नाही.

त्यामुळे विशषतः कोर्टमॅटर मध्ये अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे एकतर वर उल्लेख करण्यात आलेले पुस्तक उपलब्ध करण्यात यावे अथवा मुळ पुस्तकांच्या फोटोप्रती उपलब्ध करावी जेणेकरुन होणारी गैरसोय टाळता येईल. पुस्तक उपलब्ध करुन दिल्यास 1 कॉपी आरक्षीत ठेवावी व वर उल्लेख असलेल्या पत्यावर अथवा फोन वर सुचना दयावी जेणेकरुन लगेच खरेदी करता येईल.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर यांनी अपीलकर्ता यांना महा. सिव्हील मेडिकल कोड व्हाल्यूम एक हे पुस्तक या मुद्रणालयात नाही परंतु सदर पुस्तक पुणे येथे ग्रंथागारात उपलब्ध असल्याचे समजते. तरी आपण त्यांचे खालील पत्यावर परस्पर संपर्क साधावा व पुस्तक उपलब्ध करुन घ्यावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 12.9.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.10.2007 रोजी देण्यात आलेला असून आपण मागणी केलेली विषयांकीत पुस्तके या मुद्रणालयाचे ग्रंथागारात उपलब्ध नसल्याने आपण मागणी केलेल्या प्रकाशनाची पूर्तता करता येत नाही. या कार्यालयाचे दि. 22.8.2007 चे पत्रान्वये आपण मागणी केलेले पुस्तक हे शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार पुणे येथे उपलब्ध असल्याचे समजते असे माहिती अधिकारी यांनी निव्वळ सहकार्याचे भावतेतून आपणास कळविले होते. त्यामुळे आपली दिशाभूल झाली असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व अपील हे खारीज केलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथीत होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यानंतरही अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 12.9.2007 रोजी अर्ज केलेला दिसतो व त्याबाबतही दि. 12.9.2007 रोजी प्रकाशन व्यवस्थापक शासन मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय यांचेकडे पुस्तक उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले

दिसून येतात. दि. 4.11.2007 रोजी सहा. व्यवस्थापक (प्रकाशाने) शासन मुद्रण व लेखनसामग्री मुंबई यांनीसुध्दा माहिती अधिकारी यांना पुस्तक छपाई बाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झाला नसल्याने पुनर्मुद्रण झाले नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. दि. 16.10.2007 रोजी व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर यांनी पुन्हा प्रकाशान व्यवस्थापक शासन मुद्रण व लेखनसामग्री मुंबई यांना पत्राने विचारणा केलेली दिसून येते. व तसे दि. 31.10.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांची कोणत्याही प्रकारची दिशाभूल झालेली नाही असा निष्कर्ष काढता येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.375–377

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2593/2007.**

श्री विजय लक्ष्मण भुरे
ग्रामीण वाचनालय अभियंता कॉलनी
गणेशपूर भंडारा 441 904 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेंद्र दाभेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री पी. एन. शेंडे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.12.2007 (28.12.2007) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.10.2007 रोजी माहिती अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माझे तक्रार अर्ज दि. 26.6.2006, 22.5.2007, 12.7.2007, 13.8.207, 17.8.2007, 18.8. 2007, 27.9.2007, 28.9.2007 एकुण 8 अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रमाणीत प्रती.

माहितीचा कालावधी 26.6.2006 पासून देय तारखेपर्यंत

1. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक
2. अर्जावर कार्यालया मार्फत दिलेला शेरा व घेतलेली टिपणी
3. चौकशीसाठी नेमलेल्या अधिका–याचे/कर्मचा–याचे नाव पद व पत्ता
4 चौकशीसाठी नेमून दिलेली मुदत
5. चौकशी अधिका–याने दिलेल्या व केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रमाणीत प्रती
6. चौकशी अधिका–याने दिलेल्या अहवालावर कार्यालयाने घेतलेल्या निर्णयाची तसेच टिप्पणीची प्रमाणीत प्रत
7. कार्यालयाने घेतलेल्या निर्णयावर केलेली अंमलबजावणी
8. संबंधीत संस्थेवर झालेली कार्यवाही
9. चौकशी मुदतीत न झाल्यास चौकशी अधिका–याने दिलेली कारणे
10. सरकारी नियमानुसार संबंधीत अर्ज किती दिवसात निकालात निघाला पाहिजे मुदतीत निकालात न निघाल्यास चौकशी अधिका–यावर कोणती कारवाई करण्यात येते? ती संबंधीत चौकशी अधिका–यावर करण्यात आली का? करण्यात आली तर कारणे कोणती?

सदरची माहिती मी स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.11. 2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. सदरच्या निर्णयामध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती गैरअर्जदार

सहाय्यक निबंधक तालुका भंडारा यानी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. तसेच दिलेली माहिती अपुर्ण व विसंगत आहे तद्वतच त्यांनी मिशन शाळा कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा या संस्थेच्या कारभारा विरुध्द केलेल्या तक्रारीची चौकशी करुन अहवाल अर्जदाराला दिलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार सहाय्यक निबंधक तालुका भंडारा याना निर्देश देण्यात येते की अर्जदार श्री विजय लक्ष्मण भुरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये मागितलेली माहिती या आदेशापासून 7 दिवसाचे आंत अर्जदाराला देण्यात यावी तसेच त्यांनी केलेली मिशन शाळा कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा संस्थेच्या तक्रार अर्जातील मुद्याबाबत चौकशी करुन अहवाल 7 दिवसाचे आंत देण्यात यावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करुन त्यांना दि. 2.1.2008 रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली दिसून येते. व दिलेली माहिती ही अपुर्ण व विसंगत आहे हे सिध्द होते व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून तत्कालीन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 4.10.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व दिलेली माहिती ही अपुर्ण व विसंगत आहे असा निष्कर्ष प्रथम अपीलाच्या निर्णयात काढलेला असल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4

2) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महा. राज्य मध्यवर्ती इमारत पुणे यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सदरच्या निर्णयाची प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.378–381

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2598/2007.**

श्री शैलेश उत्तमराव निंभोरकर
मु. पो. तळेगाव (शा.पंत)
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. ऐ रा>त
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्रीमती सुलोचना निगडे
जन माहिती अधिकारी तथा
तहविलदार आष्टी
ता. आष्टी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.10.2007 रोजी शाखा व्यवस्थापक बॅक ऑफ इंडिया यांचेकडे माहिती मागण्याचा अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.10.2007 रोजी तहसिलदार यांनी शाखा व्यवस्थापक बॅक ऑफ इंडिया यांचेकडे माहिती मागण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. दि. 19.10.2007 रोजी बॅकेने तहसिलदार यांना बॅक ऑफ इंडिया यांनी नोडल अधिकारी कोण व माहिती अधिकारी कोण हे कळविलेले दिसून येते. तरीही दि. 26.10.2007 रोजी प्रथम अपील हे उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. दि. 26.10.2007 रोजी तहसिलदार आष्टी यांनी अपीलकर्ता यांना बॅकेच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी, नोडल अधिकारी कोण आहे ते कळविलेले दिसून येते. दि. 31.10.2007 रोजी उपविभागीय अधिकारी यांनी शाखा व्यवस्थापक यांना पत्र दिलेले दिसून येते. व दि. 15.11.2007 रोजी उपविभागीय अधिकारी यांनी बॅकेकडून मिळालेल्या माहितीचे पत्र अपीलकर्ता यांना पाठविलेले दिसून येते. व तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना बॅक ऑफ इंडिया या सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती हवी आहे असे दिसून येते. बॅक ऑफ इंडिया ही भारत सरकारचा उपक्रम असल्यामुळे ते स्वतंत्र प्राधिकरण आहे व त्यामुळे बॅक ऑफ इंडियाच्या कळविलेल्या माहिती अधिका–याकडे अर्ज करुन ही माहिती मागणे उचीत होते. तसेच बॅक ऑफ इंडिया आष्टी शाखा यांनी कळविल्यानंतर सुध्दा पुढील अपीले दाखल केलेली आहेत. राज्य माहिती आयोगास भारत सरकारच्या उपक्रमाच्या संदर्भातील कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या संदर्भात द्वितीय अपील दाखल करुन घेणे व सुनावणी करणे व निर्णय देणे हा अधिकार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास अधिकारीता नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.382–384

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2601/2007.**

श्री सुरेश गुलाबरावजी घेर
द्वारा श्रावण साबळेचे घर, प्लॉट नं. 44,
पडोळे नगर, वाठोडा रोड, नागपूर 8. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त
परिमंडळ क. 3 कोतवाली विभाग
नागपूर शहर
2) श्री जे. डी. दाभाडे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
कोतवाली विभाग नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2007 रोजी शासकीय जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे पोलीस हवालदार श्री किशोर मते ब.नं.2458 यांचेवर करण्यात आलेल्या विभागीय कार्यवाहीचे अहवालाची साक्षांकीत प्रत कृपया मला यथाशक्य लवकरात लवकर देण्यात यावी. व्यक्तीशः घेवून जाईन असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या सोबत अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त यांनी अपीलकर्ता यांना श्री किशोर मते यांनी केलेल्या कसुरीवरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही करुन त्यांना विभागीय शिक्षा देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.9.2007 रोजी अधिनियमाच्या कलम 8 (टजे) अन्वये आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी कळविलेला निर्णय कायम केलेला आहे किंवा अपील फेटाळण्यात आलेले आहे असे दिसून येते. व त्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2007 रोजी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये कार्यवाही सुरु असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिली नाही व अधिनियमाच्या कलम 8 (टजे) प्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले होते. ते योग्य आहे असे दिसून येते. अधिनियमाच्या कलम 8 मध्ये माहिती प्रकट करण्यास अपवाद दिलेला आहे व एखाद्या प्रकरणात चौकशी सुरु असली तरी चौकशी पूर्ण होईपर्यंत व निर्णय होईपर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे ही बाब त्या चौकशीच्यावर कोणत्याही प्रकारचा विपरीत परिणाम होवू नये म्हणून अपवाद करण्यात आला आहे व

त्यामुळे अपीलकर्ता यांना कळविलेल असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य आहे व आता मात्र संपूर्ण चौकशी संपली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10.8.2007 च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांनी द्यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.386–388

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2610 / 2007.**

श्री दिनानाथ आनंदराव खरबीकर
गोलीबार चौक, टिमकी रोड,
उमाठेचा आखाडा समोर, नागपूर 18. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कुळमेथे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर
2) श्री मते
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

केस नं. 1416/एमआरसी 81/94–95 कोर्टाचे नाव सूताने साहेब दि. 27.4.95 माया चिंतामन इवनाते. 1994–95 जातीचे प्रमाणपत्र.

सदरची माहिती स्पिड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.9.2007 रोजी मागितलेली माहिती कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे आपणास उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 24.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.12.2007 रोजी संबंधीत नायब तहसिलदार यांचे कोर्टात तसेच मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे अभिलेखागारात सदर प्रकरणांचा शोध घेतला असता आजपावेतो प्रकरण प्राप्त झाले नाही त्यामुळे रेकॉर्ड पुरविण्यास विलंब होत आहे. सदर प्रकरणांचा शोध लागल्यास त्वरीत आपणास दस्तऐवज पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.12.2007 रोजी देण्यात आलेला असून उत्तरवादी तथा माहिती अधिकारी यांनी प्रकरणांचा शोध एक महिन्याचे आत घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि. 31.12.2007 रोजी अपीलकर्ता यांना प्रकरणांचा शोध घेतला प्रकरण प्राप्त झाले नाही शासनाच्या नियमाप्रमाणे जतन कालावधी तीन वर्षाचा असल्यामुळे प्रकरण नष्ट करण्याचे आल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे जात प्रकरणातील दस्तऐवज या कार्यालयाकडून उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सन 1994:95 या कालावधीतील असल्यामुळे व जात प्रमाणपत्राच्या संदर्भातील कागदपत्रे ही 'अ' वर्गात मोडत असल्यामुळे त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र नष्ट करणे हे आवश्यक नव्हते. परंतु नष्ट केलेले आहे असे कळविण्यात आलेले नाही. त्याबाबत नष्ट करण्याकरीता आदेश

असतील तर ते अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते. अन्यथा सदरच्या प्रकरणाचा प्रत्यक्ष नायब तहसिलदार यांनी ज्या ज्या कार्यालयामध्ये सदरचे दस्तऐवज किंवा अभिलेख हे जतन करण्यात आले असतील तर त्या त्या कार्यालयात शोध घेणे हे आवश्यक राहिल. शोध घेतांना त्यावर पर्यवेक्षण करणे हे अत्यंत जरुरीचे आहे व ती काळजी तहसिलदार यांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी नायब तहसिलदार यांचे अखत्यारीत सदरच्या प्रकरणाचा कसून शोध घेण्यात यावा. नष्ट केला असल्यास आदेश सादर करावेत व हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन न दिल्याची तक्रार आल्यास संबंधीत अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक होईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2611/2007.**

श्री डॉ. रतिराम आत्माराम खुणे
रुखमिनी नगर, भंडारा खात रोड
प्लॉट नं. 63 ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर
2) डॉ. हेडावू
जन माहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक स्वास्थ केंद्र खात
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 5.6.2007 (कार्यालयात प्राप्त दिनांक 26.6.2007) रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक स्वास्थ केंद्र खात यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

कालबध्द पदोन्नती दि. 1.8.1991 प्रथम. कालबध्द पदोन्नती दि. 1.8.2003 द्वितीय सुधारीत वेतनश्रेणी व वेतन निश्चिती व थकबाकी दि. 1.1.1986 ते आजपर्यंत 4 था वेतन आयोगाची व 5 व्या वेतनआयोगाची थकबाकी मिळाली नाही. ती मला देण्यात आली नाही. आणि सव्हीसबुकची नोंद कां घेण्यात आली नाही. याची माहिती हवी आहे.

दि. 1.1.1986 ते 5.6.2000पर्यंत कालबध्दपदोन्नती दि. 1.8.1991 प्रथम, दि.1.8.2003 द्वितीय आणि सुधारीत वेतनश्रेणी व वेतन निश्चिती व थकबाकी ची माहिती हवी आहे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण माहिती उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजन न राहिल्यामुळे निर्णय दिला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांना वेतनश्रेणीची थकबाकी तसेच कालबध्द पदोन्नतीच्या संदर्भात माहिती हवी आहे असे दिसून येते. परंतु त्यांची वेतननिश्चिती व थकबाकी का काढली नाही अशी त्यांची मागणी दिसून येते. दि. 26.6.2007 च्या उत्तरामध्ये तपशिलात त्यांना संपूर्ण माहिती कळविण्यात आलेली दिसून येते. व तरीही अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपील मेमोमध्ये कोणत्याही प्रकारचे कारण त्यांनी दिलेले नाही. आयोगाकडे केलेल्या एकुण 11 मुद्याच्या तपशिलात माहिती मागण्यापेक्षा त्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारे कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कारवाई करण्याची

तरतुद नाही व त्यातही जन माहिती अधिकारी यांचे अभिमत येईल अशाप्रकारची माहिती विचारणे अपेक्षित नाही. माहिती ही कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे एवढाच मर्यादीत तरतुदी अधिनियमाच्या प्रमाणे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती पुर्ण तपशिलात आहे असे दिसून येते. वेतन निश्चिती किंवा थकबाकी मिळणे याबाबत आयोगाकडून कोणतीही कारवाई करता येणार नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.6.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.392–394

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2615/2007.**

श्री अरविंद दशरथजी वाटकर
वार्ड क्र. 1, मु. पो. ता. नागभीड
जि. चंद्रपूर 441205 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर
2) श्री सुनिल कोरडे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.7.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

सोबत जोडलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती देण्याबाबत. राममंदिर चौक नागभीड येथे शांतता भंग बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. माहितीचा कालावधी 2 जुलै 2007 ते 1. सोबत दिलेल्या अर्जावर काय कारवाई केली याचा तपशिल व फाईल नोटींग देण्यात यावी 2. नागभीड ग्रा.पं.वर काय कारवाई करण्यात आली. याबाबत तपशिल.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.8.2007 रोजी अपीलकर्ता यांचा दि. 5.7.2007 चा अर्ज हा संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे त्याबाबत अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 17.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी ब्रम्हपूरी यांनी दि. 24.8.2007 रोजी अपीलाची सुनावणी न घेता तहसिलदार नागभीड यांना जे पत्र दिलेले आहे त्या पत्रावरुन असे दिसून येते की उपविभागीय अधिकारी ब्रम्हपूरी यांनी कोणत्याही प्रकारची प्रकरणाची माहिती घेण्याचे त्रास घेतलेला दिसून येत नाही परंतु प्रकरणाचे आकलन पण झालेले दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी पुन्हा तहसिलदार नागभीड यांनाच माहिती का उपलब्ध करुन दिलेली नाही ही विचारणा केलेली दिसून येते. सुनावणी घेतली असती तर पुन्हा याबाबतचा पत्रव्यवहार टाळता आला असता किंवा अपीलकर्ता यांना योग्य ते मार्गदर्शन करता आले असते व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सुध्दा दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आपले वैधानिक कर्तव्य पार पाडले नाही असा निष्कर्ष काढावा लागतो.

4. अपीलकर्ता यांनी ज्या अर्जावर कार्यवाही करावयास तहसिलदार यांना विनंती केलेली आहे त्या प्रकरणातील संपूर्ण तपशिलावरुन असे दिसून येते की ग्रामपंचातीच्या

कार्यक्षेत्रातील असून गट विकास अधिकारी किंवा मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हापरिषद यांच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी तक्रारीचा अर्ज हा गट विकास अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक होते. व त्यामुळे तहसिलदार यांनी सदरचा अर्ज हा गट विकास अधिकारी यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.8.2007 च्या अर्जाप्रमाणे गट विकास अधिकारी यांचेकडेच माहिती मागणे संयुक्तिक राहिल. माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.395–397

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2617/2007.**

श्री संजय सुधाकर वलगांवकर व. लि.
वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था
रिजर्व बॅक चौक नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हरीष ग. चव्हाण (वाहतुक)
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (वाहतुक)
नागपूर शहर
2) श्री जमील अहमद (वाहतुक)
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त (वाहतुक)
नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त उपआयुक्त (वाहतुक) पश्चिम विभाग पश्चिम नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (1) व (2) अन्वये उपआयुक्त (वाहतुक) पश्चिम विभाग नागपूर या कार्यालयात सद्यस्थितीत जनतेस पाहिजे असलेली माहिती देण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या अधिका–यांची नावे, मुळ पदनाम, माहिती अधिका–यान्वये नियुक्ती पदनाम व कार्यालयाचा पत्ता याबाबतच्या आदेशाच्या प्रती.

2. मा. सहा. पोलीस आयुक्त तसेच मा. उपआयुक्त वाहतुक शाखा पश्चिम विभाग नागपूर यांना शासनाने काय घोषित केले आहे. उदा. विभागप्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालयप्रमुख/अन्य याबाबत शासनआदेशाची प्रत. प्रत नसल्यास स्वतंत्ररित्या माहिती कळविण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.10. 2007 रोजी अतिरिक्त माहितीच्यासाठी अतिरिक्त शुल्क रु. 4 जमा करावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरचे लेखाशिर्ष चुकीचे आहे म्हणून अतिरिक्त शुल्काचा भरणा केलेली नाही मात्र त्यांना दि. 16.10.2007 रोजी पुन्हा मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु आदेशाच्या प्रती दिलेल्या दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये अधिनियमच्या कलम 5 (1) व (2) अन्वये अधिका–यांची नावे, व पदनाम कळविलेले आहे. प्राधिकृत केलेल्या अधिका–यांची नावे कार्यालयाचे दर्शनी भागात लावलेला आहे याबाबत शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही असे कारण दिलेले आहे तसेच लेखाशिर्ष हे चुकीचे दिलेले आहे व त्यामुळे पुन्हा त्यांनी जनतेस माहिती देण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या

अधिका–यांची नावे व पदनाम असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 6.12.2007 रोजी माहिती उपलब्ध आहे घेवून जावी असे असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 4.11.2007 रोजी पुरविण्यात आलेली माहिती बरोबर आहे तसेच सुधारीत लेखाशिर्ष हे कळविण्यात आलेले आहे परंतु सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांची नावे उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे त्यांना पूर्ण माहिती उपलब्ध व्हावी अशी त्यांची विनंती. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना अधिनियमच्या कलम 5 (1) व (2) प्रमाणे पारीत करण्यात आलेल्या आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्याबरोबर अधिनियमच्या कलम 5 (1) व (2) प्रमाणे निर्गमित केलेल्या आदेशाच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2620/2007.**

श्री धनराज परसराम निमकर
नेहरु वार्ड, मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. एस. दुपारे
जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)
जिल्हा परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2006 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सौ. निशा परसराम कुंभारे रा. मोहाडी हिची आंगनवाडी सेविकेची नियुक्तीचा आदेश आपले पत्र क्र. भाजीप/मना/लेखा/1031/07 दि. 25.9.2007 नुसार अजूनपर्यंत मिळालेला नाही.

2. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालयाचे पत्र क्र. 543/07 दि. 5.4.07 ला शासनाला पाठविलेल्या प्रस्तावाबद्यल काय कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळे सदरच्या अर्जाची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो.

3. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना माहिती तयार करण्यात आली होती परंतु व्यक्तिशः नमुद असल्यामुळे व ते घेण्यास न आल्यामुळे माहिती देता आली नाही असा खुलासा आयोगाकडे केला. तसेच 28.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना सौ. निशा परसराम कुंभारे यांच्या संदर्भात पुर्वीच कळविलेले असल्यामुळे त्यांना पुन्हा कळविण्यात आलेले नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा अनेक अर्ज व अनेक अपीले दाखल केलेली दिसून येतात. राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करतांना ज्या अर्जाच्या संदर्भामध्ये किंवा ज्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल करावयाचे असते त्याबाबतची कागदपत्रे दाखल न करता इतर अपीले किंवा अर्जाची छायांकित प्रती दाखल केलेली आहेत. अनेक अर्जाच्या माध्यामातून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.401–403

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2624/2007.**

श्री चंद्रकांत शंकरराव निमजे
डी/61/5 उर्जानगर चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गिरीपेठ नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माझा मुलगा अक्षच चंद्रकांत निमजे हृदयाबाबत दक्षता पथकाच्या चौकशी अहवालामध्ये (कार्यालयीन पत्र क्र. उपस/अजप्रतस/नाग/का 5 अ (1)/1335/07 दि.1.3.07) सामाजीत चालीरीती अनुसूचित जमाती मधील हलबा जातीशी जुळून येत नाही असे लिहीले आहे. यासंबंधीत अनुसूचित जमाती मधील हलबा जामातीच्या चालीरीती, रुढी, परंपरा, प्रथा काय आहे याची सविस्तर प्रमाणीत माहिती समीतीसमोर बाजू मांडण्याकरीता आवश्यक आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.4.2002 रोजी विषयांकीत प्रकरणी कलम 2 (च) व कलम 2 (झ) (1) अन्वये ''माहिती'' व ''अभिलेख'' याचा अर्थ संज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज हस्तलिखीत असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे आपण मागितलेली माहिती ही अभिप्राय स्वरुपाची असल्याने माहिती देणे नाकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक 25.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून सदरचे अपील हे दि. 8.6.2007 रोजी खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्या प्रथम अपीलाच्या निर्णयानेसुध्दा समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी अनुसूचित जमाती मधील हलबा जामातीच्या चालीरीती, रुढी, परंपरा, प्रथा काय आहे याची सविस्तर प्रमाणीत माहिती समीतीसमोर बाजू मांडण्याकरीता आवश्यक आहे अशी माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती

अधिकारी यांनी सांगितले की कोणत्याही जमातीच्या संदर्भात निश्चित अशा चालीरीती, रुढी, परंपरा, प्रथा हया शासनाच्या कोणत्याही निर्णयामध्ये नाही व त्यामुळे समितीच्या पुढे सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनीच ते सिध्द करुन द्यावयाचे व त्यामुळे अशा प्रकारचे मत उपलब्ध करुन देता येत नाही व ते अधिनियमाच्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. त्यावरुन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असे दिसून येते व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 12.1.2007 च्या अर्जाप्रमाणे दिलेले उत्तर व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.405–407

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2622/2007.**

श्री राजेश रामभा> बन्सोड
गांधीवार्ड सिव्हील लाईन
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया (के.टी.एस.)
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती मला माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झाली असून माझा त्याबाबत कोणताही उजर नाही असे

लिहुन दिलेले असल्यामुळे तसेच अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यात आली आहे. तथापी याबाबत कोणतीही तक्रार उदभवल्यास माहिती देण्यास जबाबदार राहील असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे लिहुन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

नागपूर
**दि. 6.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.408–409

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2629/2007.**

श्री गफ्फारखान दिलावरखॉ पठान
रा. पो. ता. काटोल चंडीका वार्ड
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स सिताबर्डी नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
व्यवस्थापक
शिक्षक सहकारी बॅक लि. शाखा काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2007 रोजी मॅनेजर शिक्षक सहकारी बॅक लि. शाखा काटोल यांचेकडे एक साधा अर्ज केलेला आहे व त्या अर्जात खालीलप्रमाणे चौकशीची मागणी केलेली आहे.

1. माझे नावाचे खाते पासबुक असून त्याचा खाता क्रमांक 5085 आहे. मे. शिक्षक सहकारी बॅक लि. शाखा काटोल यांचे मुख्य ऑफीस बॅक कार्यालय नागपूर आहे.

2. मे. शिक्षक सहकारी बॅक लि. शाखा काटोल अका>ट नंबर 5085 आहे. एसबी चेक चे

From KB/D.SB/ NO. 264726 TO 264750 आहे.

3. चेक क्रमांक 264729 रु. 5000/- पाच हजाराचा चेक श्री रमेश गिरी रा. गळपूरा काटोल यांचे नाव तारीख न टाकता त्यांच्या हातात चेक दिला होता मला पैशाची अत्यंक आवश्यकता असल्यामुळे त्या कारणामुळे त्याला चेक दिला होता त्या चेकवर मागे पूढे सहया केल्या.

4. चेक घेणा-या व्यक्तीने माझे नाव व तारीख टाकुन रु. 5000/- पाच हजाराचा चेकची रक्कम त्याने स्वतः घेतली.

तारीख 3.4.2007 ओळ क्रमांक 65 चेक क्रमांक 264729 रु. 5000/- पाच हजारा विड्रॉल नोंद झाली आहे. त्याबाबत पुरावा आहे.

एकाच तारखेत दिवशी दोन विड्रॉल दर्शविले आहे. त्यावेळेस माझा पहिला विड्रॉल आहे. त्यानंतर दुसरा विड्रॉल बॅकेनी कसा दिला? त्याबाबत बॅकेनी त्याकडे दुर्लक्ष कां केले त्याबाबत दुसरा विड्रॉल संबंधी बाबत चौकशी करण्यात यावी.

त्यानंतर दि. 25.7.2007 रोजी त्या अर्जाच्या संदर्भात चौकशीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2007 रोजी अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम

अपीलाचा निर्णय हा दि. 8.10.2007 रोजी देण्यात आलेला असून अर्जदाराने मागितलेली चौकशी व अर्जदाराचे म्हणणे चुकीचे असल्यामुळे अपील फेटाळून लावण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 15.5.2007 च्या अर्जावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनीच संबंधित व्यक्तीला तारीख न टाकता चेक दिला होता. अशा परिस्थितीमध्ये जर बॅंकेने विड्रॉल दिले असेल तर त्याबाबत बॅंकेला कोणत्याही प्रकारचे विड्रॉल थांबवण्याचे कारण नाही. कोणत्याही चेकच्या संदर्भात विड्रॉल थांबवायचे असेल तर संबंधीत व्यक्तीने बॅंकेला तशी सुचना द्यावयाची असते व ती तशी दिलेली नसल्यामुळे दुस–या विड्रॉलच्या संबंधात बॅंक जबाबदार नाही असे व्यवस्थापक यांचे म्हणणे आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांची स्वतःची कृती ही त्यांनी मान्य केलेली असल्यामुळे बॅंक व्यवस्थापकाकडून कोणत्याही प्रकारची चौकशीची आवश्यकता दिसून येत नाही व त्यामुळे तशा प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. व तसेच प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 7.9.2007 च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 6.2.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2573/2007.**

श्री लक्ष्मणराव उपासराव पोटे
लालगंज, मेहंदीबाग रोड, पोस्ट ऑफीस समोर
जावेद सायकल स्टोअर्सच्या मागे, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ह. दे. कडूकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा
रहाटे चौक, धंतोली नागपूर 12.
2) श्री के. आर. गोखले
जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा
रहाटे चौक, धंतोली नागपूर 12. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.9.2007 रोजी शासकीय जन माहिती अधिकारी तथा राष्ट्रीय प्रयोगशाळा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

पो.स्टे.पाचपावलीचे पीएसआय मनोज काळबांडे यांची दि. 19.2.07 रोजी मेयो हॉस्टीटल मध्ये दारु पिल्याबाबत तपासणी करुन रक्ताचे नमूने आपले प्रयोगशाळेत पाठविले असहे. त्याबाबत खालील मुद्यावर माहिती द्यावी.

1. पीएसआय मनोज काळबांडे यांचे ब्लड सॅम्पल बी फॉर्मसह आपल्या कार्यालयात कोणी व कोणत्या तारखेला दाखल केले. बी फॉर्मची सत्यप्रत देण्यात यावी.

2. त्या ब्लड तपासणी रिपोर्टची सत्यप्रत द्यावी.

3. रक्ताचे नमूने घेतल्या पासून 24 तासाचे आंत तपासणीला पाठविणे गरजेचे व बंधनकारक आहे काय?

4. 24 तासानंतर रक्ताचे नमूने प्राप्त झाल्याचे ते खराब होतात हे बरोबर आहे काय?

5. पीएसआय मनोज काळबांडे पो.स्टे.पाचपावली यांचे रक्ताचे नमूने फार उशिराने तपासणीस पाठविण्याने ते खराब झाले व त्यामुळे अल्कोहील तपासणीस योगय नव्हते व त्यामूळेच त्यांचे रक्ताक अल्कोहीलचे प्रमाण येवू शकत नाही ते बरोबर आहे काय?

6. ब्लड सॅम्पल उशिराने दाखल करण्यास पो.स्टे.पाचपावलीचे कोणते अधिकारी जबाबदार आहे. सी.अे.तपासणीला कोणी पत्र पाठविले त्या पत्राची प्रत द्यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

3. मागितलेल्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.9.2007 रोजी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 11.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.11.2007 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ख) व (ज) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यावरुन असे दिसून येते की श्री मनोज काळबांडे या त्रयस्थ पक्षाची माहिती रक्त नमुने प्रयोगशाळेत पाठविल्याच्या संदर्भात प्रयोगशाळेतून माहिती मागितलेली दिसून येते. यावरुन सदरची माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे हे स्पष्ट होते. तसेच प्रयोगशाळेकडे जे रक्त नमुने तपासणीसाठी पाठविले जातात ते गुन्हयाच्या संदर्भामध्ये पोलीस विभागाकडून पाठविले जातात. याचा अर्थ गुन्हयाच्या तपासाची प्रक्रिया सुरु असते व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (1) (ज) प्रमाणे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हयाकरीता अपवाद करण्यात आलेला आहे. तसेच अधिनियमाच्या कलम 8 (ख) प्रमाणे न्यायालयात प्रकरण असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही असेही माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. तसेच सदरची माहिती ही वर नमुद केल्याप्रमाणे प्रयोगशाळेकडे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेली असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद करता येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.9.2007 अर्जास विहित मुदतीत दिलेले उत्तर व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.413–415

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2575/2007.**

श्री गंगाधर नत्थुजी कांबळे
1/71, श्रीहरीनगर, नागपूर 27. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत. परंतु त्यांचे कार्यालयातील अधीक्षक हया हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.7.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी अधीक्षक शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे 1997 ते 10.7.2007 या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन 2697/8297/74 मा.शि–2 दिनांक 19.6.96 परिशिष्ट 8 ब दि. 17.9.80 पासून बिंदूना लागू करण्याचे निर्देश सत्यप्रत

2. शासन निर्णय बीसीसी 1097/प्रक्र30/97/16ब दि. 21.9.1998 व दि.13.1098 पत्र क्र. एसएसएन 2697/846/97 मा.शि–2 सत्यप्रत

3. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ अवमान याचिका क्र. 57/06 च्या संदर्भात दिनांक 29.8.06 चे सुनावणीत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत तसेच शासकिय निर्णय व न्यायालयाचे निकालाची प्रत. उच्च न्यायालय नागपूर 199 एमएच एल जे ढगे 305 भिडे गर्ल्स एज्युकेशन सोसायटी विरुध्द शिक्षणाधिकारी जि.प. नागपूर व इतर सत्यप्रत देण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.8.2007 रोजी मुद्या क्र. 1 ची माहिती व मुद्या 3 मधील अवमान याचिका क्र. 57/06 मधील निर्णयाची छायांप्रत सांक्षांकीत करुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उर्वरीत मुद्या क्र. 2 व 3 मधील माहितीचा शोध घेतला असता कार्यालयात उपलब्ध नसल्याने देता येणार नाही. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दिनांक 29.8. 2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्र. 1 ची माहिती दिलेली आहे परंतु मुद्या क्र.3 मधील माहिती दिलेली नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. उपस्थित असलेल्या कार्यालयातील अधीक्षिक यांनी त्यांना सदरच्या प्रकरणामध्ये माहिती नाही असे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 2 व 3 मधील प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोन्ही पक्षकाराचे उपस्थितीत सुनावणी घेवून निर्णय देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता सदरचे प्रकरण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून कारणमिमांसा देणारा निर्णय देण्याकरीता व माहिती देण्याकरीता हस्तांतर करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे प्रकरणात प्रथम अपीलाची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेवून अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांच्या दि. 10.7.2007 च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 2 व 3 मधील माहिती उपलब्ध करुन देण्यास ज्या अधिकारी किंवा कर्मचा–यानी टाळाटाळ केलेली असेल त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी व तसे आयोगास कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.416–418

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2537/2007.**

श्री वसंत केशव तुपटे
मु. लोहारा पो. जांब
ता. तुमसर जि. भंडरा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दुष्यंत सिडाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स (अनेक्स) सिताबर्डी नागपूर
2) श्री अशोक हेडावू
जन माहिती अधिकारी तथा
शाखा व्यवस्थापक
भंडारा जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक
शाखा तुमसर
ता. तुमसर जि. भंडरा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून शाखा व्यवस्थापक भंडारा जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

31 मार्च 1998 ते 31 मार्च 2006पर्यंत

1. कोणत्या प्रकारचे कर्ज कोणत्या कास्तकाराला कोणत्या उद्येशासाठी कोणत्या तारखेला देण्यात आले याची माहिती दयावी.

2. वरील कर्ज किती वसूल झाले व किती बाकी राहिले याची तारीखवार माहिती

3. विमा क्लेम किती व कोणाला कोणत्या तारखेला मिळाला याची माहिती दयावी.

4. कर्ज नसल्याचे दाखले 1998 ते 31 मार्च 2006पर्यंत कोणाला कोणत्या तारखेला प्रदान करण्यात आले याची माहिती दयावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.3.2007 रोजी शाखा व्यवस्थापक यांनी 20.3.2007 रोजी कार्यालयीन वेळेवर 11.00 वाजता हजर राहावे असे पात्र पाठविलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र दि. 20.3.2007 रोजी मिळाले व त्यामुळे 20.3.2007 ला उपस्थित राहिले नाही त्यामुळे दि. 28.4.2007 रोजी त्यांनी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी व्यवस्थापक तथा माहिती अधिकारी यांना 7 दिवसाचे आंत शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले होते व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. ती प्रतिलिपी अपीलकर्ता यांना मिळालेली असून सुध्दा अपीलकर्ता हे माहिती घेण्यास न जाता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती घेण्यास जाणे आवश्यक होते. व माहिती उपलब्ध झाली नाही तर आक्षेप घेणारे पत्र द्यावयाचे असते तसे अर्ज दिल्यानंतर किंवा बॅकेनी त्यांना बोलाविल्या नंतरसुध्दा माहिती घेण्यास ते गेलेले नाहीत. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश असल्यावर माहिती घेण्यास गेलेले दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.3.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.419–421

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2563/2007.**

श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल
मु. पो. ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार सडक अर्जुनी जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिल कार्यालय सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.11.2007 (8.11.2007) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय सडक अर्जुनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
स्वस्त धान्य दुकान व रॉकेल परवानाधारक माहूली ता. सडक अर्जुनी बाबत.
माहितीचा कालावधी दि. 27.8.07 ते 1.9.07

1. दि. 27.8.07 ला माहूली या विषयांकीत गावाबाबत आदेश निर्गमीत झाले ते आदेश कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आले. त्या कागदपत्राची सत्यप्रती

2. तसेच 1.9.07 ला पुन्हा 27.8.07 ला आदेश रद्य करण्यात आले. त्यामुळे बहाल करण्यात आलेले आदेश कोणत्या कागदपत्राच्या आधारे रद्य करण्यात आले. त्या कागदपत्राची सत्यप्रत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल तहसिलदार यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.10.2007 रोजी देण्यात आलेला असून अपील अर्जात नमुद केल्याप्रमाणे सदर शिधापत्रक पुर्ववत जोडण्याचा कोणताही आदेश त्या दिवशी सायंकाळी करण्यात आली नाही असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्याबाबत अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडे आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता कोणतेही आदेश केलेले नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस विद्यमान माहिती अधिकारी हजर आहेत. सदरच्या अपीलाची सुनावणी ही दि. 9.1.2009 रोजी ठेवण्यात आली होती. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नसल्यामुळे व माहिती का देण्यात आली नाही अपील कशाप्रकारे निकालात काढण्यात आले याबद्यल तेच माहिती देवू शकतात या कारणास्तव त्यांना नोटिस काढून आयोगासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे आयोगासमोर हजर झाले नाहीत. सहा. माहिती अधिकारी श्री बी. टी. यावलकर यानी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला.

1. मा. अपीलकर्ता नामे श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल मु. पो. ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया यांनी त्यांनी प्रस्तुत केलेल्या अनुच्छेद अ मधील अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला नाही. त्यामुळे माहिती संबंधाने अपीलकर्त्यास कळविण्यात आले नाही.

2. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील अर्जासोबत अनुच्छेद अ ची झेरॉक्स प्रति दिले त्यात दि. 3.9.07 असे दिसून येते विषयांकित अपील प्रकरणासह प्राप्त नोटीसासह अनुच्छेद अ च्या झेरॉक्स प्रति मध्ये दि. 13.9.07 असे स्पष्ट दिसत आहे. कार्यालयातील डिस्पेचरला विचारना केले असता वरील तारखेला अर्ज प्राप्त झाला नाही असे लेखी दिले आहे. त्यामुळे सदर अपील फेटाळण्यात यावी.

3. अपीलकर्त्याने सहपत्र ब मध्ये अपील केले. त्यानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अनुच्छेद अ मध्ये अर्ज प्राप्त न झाल्याने प्रथम अपील फेटाळावयास पाहिजे होते. तरीपण प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 26.10.07 चे आदेशान्वये माहितीचे संबंधाने सविस्तर विवरण त्यात विषद केले आहे. ते माहितीचे संबंधाने पुरेसे आहे. कारण सदर प्रकरणात दि. 27.8.2007 व दि. 2.9.2007 चे आदेशाकरीता कोणत्याही कागदपत्राचा आधार घेण्यात आला नाही. त्यामुळे कथीत कागदपत्रे देता येत नाही याबाबद दि. 26.10.07 चे आदेशात नमुद असल्याचे दिसून येते.

4. द्वितीय अपील अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी मुद्दा क्र. 8 मधील अ नुसार आवश्यक असलेला माहितीचा विषय व स्वरुप मध्ये व्यक्त केलेल्या मुद्यांशी वास्तविक माझा काहीही संबंध नाही.

सबब प्रकरणातील नोटशिटच्या झेरॉक्स प्रत आदेशाच्या प्रती, डिस्पेचर यांनी लेखी दिलेल्या पत्राच्या प्रती, दि. 26.10.07 रोजी झालेल्या आदेशाची प्रत यासह सलग्न करुन सादर, वरील मुद्येनिहाय उत्तराचे अनुषंगाने अपीलकर्ताचे अपील अमान्य करण्यात यावी ही विनंती.

खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी डिस्पॅचरकडून सिल घेवून अर्ज मात्र दिला नाही. यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की असे असले तरी प्रथम अपीलाच्या सुनावणीस श्री बी.टी.यावलकर सहा.माहिती अधिकारी तथा अवल कारकुन हे हजर होते व त्यावेळी त्यांनी अर्ज प्राप्त झाला नाही त्यामुळे माहिती संबंधाने अपीलकर्त्यास कळविण्यात आले नाही. परंतु तसे प्रथम अपीलाच्या निर्णयात दिसून येत नाही. व यावरुन डिस्पॅचर यांनी स्टॅम्प दिलेला असला तरी डिस्पॅचर यांनीच तो अर्ज नोंदविलेला दिसून येतो. याकरीता सदरच्या प्रकरणामध्ये विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती चौकशी करुन सहा.माहिती अधिकारी किंवा डिस्पॅचर यांचेपैकी एका अधिका–यावर जबाबदारी निश्चित करणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन सहा.माहिती अधिकारी किंवा अधिकारी अशाप्रकारचे दिशाभूल करणारे कार्य करणार नाही. व त्याकरीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.9.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) तत्कालीन माहिती अधिकारी तसेच सहा. माहिती अधिकारी व डिस्पॅचर यांच्या संदर्भात सदरच्या प्रकरणात चौकशी करावी व जबाबदारी निश्चित झाल्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही उपविभागीय अधिकारी देवरी यांनी तीन महिन्याचे आंत करावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपविभागीय अधिकारी देवरी जि. गोंदिया यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.422–426

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2641/2007.**

श्री चंद्रशेखर पोपट चौधरी
प्लॉट नं. जी 13, फ्लॅट नं. बी 2,
आदित्य अपार्टमेंट, पूर्ती बाजारसमोर आठरस्ता चौक,
लक्ष्मीनगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर
2) डॉ. देवेंन्द्रनाथ मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा
परीक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.8.2006 रोजी जन माहिती अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

विज्ञानसंस्था नागपूर विद्यापीठ येथील एम.एस.सी.च्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केल्याबद्दलचे विद्यापीठाचे सोबत जोडलेले दि. 7.2.2007 चे पत्र योगय वाटते. या पत्रातील अ क्र. 4 ची विद्यार्थीनी कु. प्रिंयंका तभाने हिचा प्रवेश सुध्दा रद्द झाल्याचे दिसून येते तसे पत्रात म्हटलेच आहे परंतू सदर विद्यार्थीनीला मात्र विद्यापीठाकडून प्रवेश रद्द केल्यानंतर विशेष सूट मिळाल्याचे कळते त्यासंबंधी खाली विचारलेली माहिती आवश्यक वाटते.

1. एकदा प्रवेश रद्द केल्यानंतर कु. प्रिंयंका तभाने हिचा प्रवेश विद्यापीठाच्या कोणत्या नियमानुसार ग्राहय धरण्यात आला?

2. सदर विद्यार्थीनीचा प्रवेश निश्चित करण्यासाठी संचालक कार्यालय विज्ञानसंस्था नागपूर यांच्याकडून विद्यापीठास केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती

3. कु. प्रिंयंका तभाने हिचा प्रवेश ग्राहय धरण्यात येईल असे विद्यापीठाचे विज्ञानसंस्था कार्यालयास दिलेले पत्राची सत्यप्रत.

सदरची माहिती स्पिड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 3.10.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.12.2007 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला असून अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे त्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी जी माहिती दि. 23.8.2007 रोजी मागितलेली आहे ती माहिती ही दि. 3.10.2007 रोजी उपलब्ध करुन देण्यात आली. याचा अर्थ 9 दिवसाच्या विलंबाने

माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता अर्जदार हा ज्या दिवशी सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करतो ती तारीख अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ग्राहय धरली जाते. विशिष्ट जन माहिती अधिकारी यांचेकडे तो अर्ज विलंबानी गेला असल्यास ती कार्यालय व कार्यालय प्रमुख यांची अकार्यक्षमता दिसून येते. व माहितीचा अधिकार अधिनियमच्या तरतुदीबाबत कार्यालय प्रमुख हे गंभीर आहेत असे दिसून येत नाही.

5. उपलब्ध झालेली माहिती ही समाधानकारक नाही याबद्यल अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांना दिनांक 3.10.2007 रोजीच्या मुद्या क्र. 2,3 च्या उत्तरामध्ये त्यांनी गुणपत्रिका मागितलेली नसल्यामुळे जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. मुद्या क्र. 1 प्रमाणे नियमांची प्रत मागितली पण ती देता येत नाही. मुद्या क्र. 2 व 3 पत्रव्यवहाराच्या प्रती मागितलेल्या आहेत व त्या उपलब्ध करुन दिलेल्या नसल्यामुळे सदरची माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

6. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की त्यांना पुर्नमुल्यांकना नंतर प्रवेश देण्यात आला आहे व त्याबाबत गुणपत्रिका, परीक्षा फॉर्म हे नष्ट केलेले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. याचा अर्थ तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे ते दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहे.

7. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व माहिती अधिकारी यांचा निर्णय आहे तसाच कायम ठेवलेला आहे. यावरुन प्रथम अपीलात अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची संधी देण्यात आलेली नाही. व असा माहिती देण्याचीच टाळाटाळ करण्याचा प्रयत्न आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1,2 व 3 च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 23.8.2007 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 च्या संदर्भात नियमाची प्रत, 2 व 3 च्या संदर्भात उपलब्ध असलेल्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांनी माहिती ही विलंबानी उपलब्ध करुन दिली असून अपुर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे व सदरची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

3) प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांना संधी दिलेली नसल्यामुळे एकतर्फी देण्यात आलेला दिसून येतो व त्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यापुढे दक्षता घेणे आवश्यक आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.427–430

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2644/2007.**

श्री प्रभाकर रामराव वराडे
मनोरमा, विद्यानगर कॉलनी
टी.बी. टोली मागे, गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. के. राउत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
2) श्री पी. व्ही. डोंगरे
जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आपल्या कार्यालयातील नोंदणी क्र. 321 दि. 30.3.06 नुसार 3 प्रवासभत्ता देयके, शा.ग. वि. देयक मंजूरीबाबत (422 दि. 25.5.2007)

माहितीचा कालावधी 2006–2007

1. एप्रिल 2006– 1368

2. मे 2006 – 835

3. से.नि.स्वगावी प्रवास – 16658

———————

18751 एकुण वरील देयके आजपर्यंत मंजूर झाली नाहीत व ती केव्हा मंजूर करुन प्रदान करण्यात येतील.

4. शा गटविमा देयक क्र. 422 दि. 25.5.2007

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 20.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.10.2007 रोजी देण्यात आलेला असून श्री वराडे यांचे बिल मान्य करण्यात येत आहे. अर्जदाराचे प्रलंबित देयके केव्हा मिळतील व त्या बिलाची सद्यस्थिती काय आहे याची माहिती लेखी स्वरुपात आठ दिवसांत अर्जदारास देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही केलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. यावरुन अपीलकर्ता यांनी आजपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी सांगितले. दि. 16.6.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी हे दोषी आढळून येतात व अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिल्या नंतर सुध्दा त्यावेळेस म्हणजे दि. 24.10.2006 रोजी जे माहिती अधिकारी असतील त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द सुध्दा अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक ठरते व त्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.6.2007 च्या अर्जात मागितलेल्याप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यावेळेस जे माहिती अधिकारी असतील त्यांचे विरुध्द सुध्दा शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4) वरील प्रमाणे दोन्हीही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया**

यांनी त्यांना लागू असलेल्या सेवानियमाप्रमाणे करणेसाठी सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.2.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.431–434

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2650/2007.**

श्रीमती मंजु दिक्षीत
रा. प्लॉट नं. 23, सादीकाबाद कॉलनी
मानकापूर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
1. श्री डी. एस. ठाकरे अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर
2. श्री गुंड नगर भूमापन अधिकारी क. 3 नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Mouza Mankapur Survey No. 6 As per 7/12 extract 133 Rs How much area acquired by Govt. of Survey No. 6 for construction of Ring Road and How much area remains balance As per J.M.R.map dated 3.10.92 Mamla Kramank 363/92.

दोन्ही अर्जाज एकच माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.12.2006 रोजी मौजा मानकापूर येथील जे.एम.आर.नकाशा 3.10.92 मामला क्र. 363/92 मधील सर्व्हे नं. 6 सात बारा प्रमाणे रींगरोड मध्ये कीती क्षेत्र गेले व शील्लक कीती अशी माहिती विचारण्यात आली. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता सर्व्हे नं. 6 संपादीत क्षेत्रात व जे.एम.आर.नकाशा दि. 3.10.92 मामला क्र. 363/92 मध्ये आढळून आलेला नसल्याने माहिती पुरविता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते.

3. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.1.2007 रोजी उपसंचालक भूमीअभिलेख यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.2.2007 रोजी देण्यात आलेला असून नगर भूमापन अधिकारी क्र. 3 नागपूर यांची मुळ धारिका व भूसंपादनाचा मुळ नकाशा व त्यासोबतचे पत्र पाहिले असता त्यात अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नाही. तसेच सदर मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) अंतर्गत येत नाही. तसेच जी माहिती कार्यालयात कोणत्याही स्वरुपात उपलब्ध नाही, ती माहिती अर्जदार यांना पुरविणे शक्य नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या निर्णयामुळे सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी त्यांनी अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना रस्ता रुंदीकरणामध्ये किती क्षेत्र गेले व शिल्लक किती क्षेत्र राहिले याबद्यलची माहिती कोणत्याही कार्यालयातून मिळत नाही. तसेच त्यांनी जो सोबत नकाशा दाखल केला आहे त्यातील नकाशातून सुध्दा त्याबद्यलचा उल्लेख केलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की नकाशा दिनांक 3.10.95 चा आहे व मामला क्र. 310/92 चा असल्यामुळे अभिलेखागारामध्ये मामला क्र. 363/92 ची नस्ती उपलब्ध आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व तशाच प्रकारे प्रथम अपीलाचा निर्णय आहे. व म्हणून सदरची माहिती अधिनियमच्या कलम 2 (च) मध्ये यत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की रस्ता रुंदीकरणाच्या संदर्भामध्ये कोणत्याही सर्व्हे मधील जे क्षेत्र गेले असेल व जे शिल्लक राहिले असेल त्याबाबतची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असलेच पाहिजे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की शासनाचा भूखंड असला तरी तशा प्रकारचे क्षेत्र देण्याची आवश्यकता नसते. अपीलकर्ता यांना मा. उच्च न्यायालयाचा आदेश हा नुकसानभरपाई म्हणून सर्व्हे नं. 6 मधील क्षेत्र त्यांना दिलेले आहे व त्यामुळेच सदरची माहिती त्यांनी मागितलेली आहे. ती संपूर्ण तांत्रिक बाब असल्यामुळे प्रत्यक्ष अभिलेख तपासून नकाशे तपासून व भूसंपादनाच्या प्रकरणातील नकाशे तपासून निश्चित अशी माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी नगर भूमापन क्र. 3 या कार्यालयात जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व त्यांचेकडील असलेली कागदपत्रे माहिती अधिकारी यांना तपासण्यासाठी सादर केल्यास माहिती उपलब्ध होवू शकेल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.12.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नगर भूमापन कार्यालयात असलेल्या अभिलेख भूसंपादनाचे प्रकरण तसेच अपीलकर्ता यांचेकडे असलेली कागदपत्रे यांची तपासणी करुन मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये वस्तुस्थिती तसेच उपलब्ध असल्यास छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी क्र. 3 नागपूर कार्यालय यांचेकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून उपस्थित राहून संपूर्ण प्रकरणात तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.436–439

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2654/2007.**

श्री अरुण निळकंठराव हर्षबोधी (सरचिटणीस)
प्रजासत्ताक शिक्षक संघ म.रा.
द्वारा श्रृणाईत निवास नागरी बॅंक कॉलनी
सिंदी मेघे वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. के. पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे सन 2004 पासून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. ज्ञानेश्वर वाघमारे, तारा मेसेकर (हिंगणघाट), सौ. सुशिला वाघमारे (कोपरा), कु. शिला जारी व रत्नाकर निखारे (वर्धा) यांचे प्रलंबीत प्रकरणाची कार्यपूर्ती अहवाल

2. सन 2004–2005 पासून सरळसेवा भरती व पदोन्नतीस मान्यता प्रदान केलेली यादी

3. मागासकक्ष आयुक्त नागपूर यांचेकडून सरळसेवा भरती व पदोन्नतीकरीता आरक्षीत बिंदू प्रमाणीत करणा–या व न करणा–या शै.संस्था यादी

4. राष्ट्रीय सामाजिक शिक्षण संस्था संदर्भात दि. 14.7.06 ला दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अहवाल.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे असे सांगितले की त्याला आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती त्या अर्जाप्रमाणे मिळालेली नाही किंवा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार त्या संदर्भात झालेला नाही. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती घेण्याकरीता मुदतीत जाणे आवश्यक असते व तसे ते गेले होते व त्यांना माहिती उपलब्ध करुन नाही अशा प्रकारचा पत्रव्यवहार त्यांनी सादर केला नाही. परंतु सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र. 1 हा मोघम आहे व प्रलंबीत प्रकरणाचा कार्यपूर्ती अहवाल यावरुन कोणत्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे हे स्पष्ट होत नाही. मुद्दा क्र. 2 मधील माहिती ही गटशिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असते व ती उपलब्ध

करुन देता येईल. विशेष प्रकरणाच्या मान्यतेसाठी मात्र सदरची बिंदूनामावली नस्ती सोबत जोडली जाते व त्यामुळे ती गटशिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसते. मुद्या क्र. 4 मधील अंमलबजावणी अहवाल हा दि. 14.7.06 ला दिलेल्या निर्णयाचा आदेश असल्यामुळे प्रत्येक संस्थेत उपलब्ध असते व त्यामुळे सदरची माहिती ही सुध्दा संस्थेकडून उपलब्ध करुन देता येईल. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये या संपूर्ण माहितीच्या संदर्भामध्ये निर्णय देणे आवश्यक होते. जेणेकरुन अपीलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता राहिली नसती. परंतु तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्याबाबत त्यांना समज देणे आवश्यक राहिल. मात्र मुद्या क्र. 2 च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी. व पोच द्यावी. मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी तपशिल द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध

करुन द्यावी. मुद्दा क्र. 3 व 4 च्या संदर्भामध्ये संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.440–443

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2657/2007.**

श्री धनजी विरजी शहा (अध्यक्ष)
शिक्षण प्रसारक मंडळ, मूल जि. चंद्रपूर
शासकीय विश्राम गृह मार्ग, ता.मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण)
नागपूर विभाग नागपूर
2) श्री जे. एन. सहारे
जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी
सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. प्राचार्य ते.क.कापगते यांना मंडळाने बडतर्फ केले. आदेश क्र. 412/07 दि.19.4.07

2. कापगते यांचेवर चंद्रपूर न्यायालयात फौजदारी दावा दाखल आहे. पत्र क्र. 404/07 दि.7.4.07

3. 1. कापगते यांचे विरुध्द विभागीय चौकशी

   2. मंडळाला रु. 1750912/- कापगते कडून घेणे

   3. 1998 मध्ये पोलीस कोठडी गुन्हा दाखल पत्र क्र. 380 दि. 26.2.07

1. सेवानिवृत्ती प्रकरणासोबत वरील माहिती पाठविली नाही असे का?

2. निवृत्ती प्रकरणात वरील बाबीचा उल्लेख असणे आपणास अनिवार्य वाटले नाही काय? कारणे?

3. वरील वस्तूस्थिती मंडळ व महालेखाकार यांचेपासून दडवून ठेवण्याची कारणे काय?

4. महालेखाकार (द्वितीय) यांचेकडे निवृत्ती प्रकरणात आपण वरील बाबी कळविल्या नाहीत यामुळे कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाल्यास त्याला जबाबदार कोण?

5. कापगते यांची बडतर्फी, फौजदारी प्रकरण, मंडळाला घेणे असलेली रक्कम याबाबी सेवानिवृत्ती प्रकरणात अती महत्वाच्या असूनही आपण दखल घेतली नाही असे का? कृपया मुद्येसुद माहिती पुरवावी.

सदरची माहिती पोष्टाने पाठवू नये. दुताकरवी घेतली जाईल असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना आपण श्री कापगते यांच्या संबंधात विविध प्रश्न व त्यावर करावयाची कार्यवाही तसेच एखादा आदेश किंवा निर्णय वैध आहे काय आणि संबंधीत प्रकरणात जबाबदार कोण इत्यादी माहिती मागितली याबाबत आपणास सुचीत करण्यात येते की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (क) खाली सदर माहिती देता येत नाही फक्त शासनाच्या अभिलेख्यामध्ये

उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. विशिष्ट मुद्या वरील मते कोणती इत्यादीचा समावेश माहितीच्या व्याख्येत होणार नाही तथापी श्री कापगते यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणात या कार्यालयाने केलेली कार्यवाही योग्य आहे असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 4.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय देतांना सेवानिवृत्ती प्रकरणाच्या संदर्भात तपासणी केलेली दिसून येते व त्याबद्यलची माहिती दिलेली आहे. त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता आज गैरहजर आहेत व त्यामुळे त्यांचे स्पष्टीकरण दाखल झालेले नाही. परंतु त्यांनी दि. 25.5.2007 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्न असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे देण्याची आवश्यकता नाही व तसे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी प्राचार्य कापगते यांच्या विभागीय चौकशीच्या संदर्भामध्ये व बडतर्फीच्या संदर्भामध्ये पाच मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील कारणे विचारलेली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये ''माहिती'' या संज्ञेंची व्याख्या दिली आहे. व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेख, टिपण्या, परिपत्रके, निर्णय या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्याच्या छायांकीत प्रती घेणे असा ''माहितीचा अधिकार'' आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात अभिमत अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले कारण हे योग्य आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम

2005 च्या तरतुदीच्या चौकटीतच घेणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये तपासणी करुन विवेचन केलेले दिसून येते. ते वरील माहितीच्या प्रमाणे अपेक्षित नाही. माहिती अधिकारी यांनी दिलेले निर्णय योग्य आहे किंवा अयोग्य आहे याबाबत निर्णय देणे अपेक्षित असते. असे असले तरी अपीलकर्ता यांना अधिकची माहिती त्यातून उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 25.5.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.444–447

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1/2008.**

श्री एन. डी. नवघरे
जेल रोड, चर्चच्या मागे, भंडरा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री श्री. म. आपटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग (राज्य) भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता
लघु पाटबंधारे उपविभाग साकोली
ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2007 (15.1.2008) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे उपविभाग साकोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

शासनाने मंजूर केलेल्या जमिनीचा तपशिल व 7/12, नकाशा सदर जमीन आपण निवास आणि कार्यालयाचे उपयोगासाठी वापरत आहा. तरी सदर जागा अकृषक केव्हा केली व आतापर्यंत दरवर्षी किती अकृषक कर भरला आहात त्याचा तपशिल.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. व त्याकरीता मोबाईल क्रमांक दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.9.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.10.2007 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही पुरेशी आहे या कारणास्तव अपील नामंजुर करण्यात आले. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी अर्जामध्ये पाटबंधारे विभागाच्या मालकी हक्काच्या संदर्भामध्ये व अकृषक बदल केल्याच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना माहिती ही अपूर्ण दिलेली आहे. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांनी अकृषक झाल्याच्या संदर्भात जी माहिती मागितलेली आहे त्याबद्दल त्यांना कळविण्यात आलेले आहे. मात्र 7/12 चा उतारा हा देण्यात आलेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयात या बाबीचा विचार केलेला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांनी अपील का केले याबद्यलचा विचार करणे आवश्यक असते व त्यामुळे पुरवलेली माहिती पुरेशी आहे अशा प्रकारचे उत्तर देणे व ते सुध्दा माहिती अधिकारी यांनीच देणे हे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन आहे. अपीलाचा निर्णय हा अपीलीय अधिकारी यांचाच असला पाहिजे याबाबत अपीलीय अधिकारी यांनी सामान्य ज्ञान अवगत करुन घेणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.8.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती संबंधित जमिनीचा 7/12 चा उतारा, नकाशा व अद्यावत 7/12 चा उतारा या प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.448–450

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2663/2007.**

श्री पंडित हिरामणजी कंडे

C/o कंडे (पटवारी) मु. पो. बोरगाव (मेघे)

ता. जि. वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर

2) डॉ. व्ही. आर. खेडीकर

जन माहिती अधिकारी तथा

सहाय्यक संचालक

आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर

ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.7.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माहे 01–02 ते 11.6.07पर्यंतची वेतनाची थकबाकी 2. मे 03 ते मे 06पर्यंतची वेतनवाढीची थकबाकी 3. 05 ते 9–06पर्यंतचे वैद्यकीय रेजेचे वेतन अदा करण्यात आलेली नाही. 4. 2–04 ते 2–05 चे वेतन देण्यात आले नाही. 5. ऑगष्ट 02 पासून चंद्रपूर जिल्हयात 15 टक्के नक्षलग्रस्त भत्ता मंजूर केलेला आहे. परंतु आजपावेतो देण्यात आलेला नाही. 6. ऑगष्ट 02 पासून अतिरिक्त घरभाडे भत्ता/एकस्तर पदोन्नती देण्यात आली नाही व थकबाकी मिळाली नाही. 7. जुलै 03 व मे 06 मध्ये अर्जित रेजेचे वेतन अदा केले नाही. 8. एप्रील 06, ऑगस्ट 06 व सप्टेंबर 06 चे प्रवास भत्ता देयकाची रक्कम अजूनपर्यंत मिळाली नाही वरील मुद्या क्र. 1 ते 8 ची माहिती व केलेली कार्यवाहीचा तपशिलवार माहिती व त्याबाबतच्या छायांकीत प्रती देण्यात याव्या. माझे विनंती अर्ज दि. 20.5.03, 10.12.04, 6.1.05, 20.1.05, 27.1.05, 3.2.05, 7.2.05 च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिलवार माहिती देण्यात यावी.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 15.10.2007 रोजी माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात येवून त्याची प्रत अर्जदारास दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी दि. 30.7.07 च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी

सांगितले की सदरचा अर्ज त्यांचेकडे दि. 10.8.2007 रोजी प्राप्त झाला. तसेच दिनांक 14.8.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु मुळ नस्ती ही उपलब्ध नसल्यामुळे उपसंचालक आरोग्य सेवा यांचेकडे जी माहितीची प्रत उपलब्ध आहे ती सादर केलेली आहे. यापूर्वीसुध्दा अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे याच मुद्याकरीता माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

श्री पी. एच. कंडे, सांख्यिकी सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया हे पुर्वोक्त कालावधीत सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर येथे कार्यरत असतांना कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी न घेता वारंवार अनधिकृत गैरहजर असल्याने त्यांची सदर कार्यालय प्रमुखाने असाधारण (विनावेतन) रजा केलेली असुन कर्तव्य कालावधीचे वेतन त्यांना अदा करण्यात आले आहे.

परंतु श्री कंडे हे स्वतः अनधिकृत गैरहजर राहून कार्यालयास वेठीस धरण्याचे दृष्टीने स्वतःचे गैरहजेरीचे वेतन, नक्षलग्रस्त भत्ता, अतिरीक्त घरभाडे भत्ता इत्यादी स्वतःचे प्रलंबीत देयकाची माहिती मागवित आहे.

सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर त्यांचेकडील पत्र क्र. ससआसे/कु./चंद्रपूर/पीएचकं/625–632/07 दि. 24.9.07 अन्वये प्रलंबीत थकबाकीबाबत विस्तृत माहिती संबंधितास दिलेली आहे.

सदरहु प्रकरणी श्री कंडे यांनी दि. 13.9.2007 रोजी केलेल्या अपीलाचे अनुषंगाने उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर यांनी सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर यांना माहिती देण्यास्तव पत्र क्र. ब–2आस्था/माहि–अधि/अपील/13487/07 दिनांक 15.10.07 अन्वये निर्देश दिलेले असून त्याची प्रत श्री कंडे यांना सुध्दा देण्यात आली आहे. सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र दि. 24.9.2007 रोजी माहिती देण्यात आली आहे. श्री कंडे यांनी त्यांच्या स्वतःच्या वेतन व भत्त्याबाबत

माहिती मागितलेली होती ज्या कालावधीत ते गैरहजर होते त्या कालावधीचा निर्णय वेळोवेळी सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर यांनी घेवून त्यांच्या गैरहजेरीचा कालावधी असाधारण रजा म्हणून केलेला आहे. याबाबतचे सविस्तर विवरणपत्र सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) चंद्रपूर यांचेकडून प्राप्त करुन (आठ मुद्ये) अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

व त्यावरुन अपीलकर्ता हे स्वतः अनधिकृतरित्या गैरहजर राहून माहिती मागवित आहेत असे दिसून येते. अर्जदाराना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहिती वरुन अपीलकर्ता अर्जदार यांच्या सेवेत त्यांनी ब–याच प्रमाणात अनियमितता केलेली दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा कार्यालयास वेठीस धरणे असेच दिसून येते त्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित आहे असे दिसुन येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे तसेच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामधून त्यांची सर्व मागणी मंजूर करण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.9.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.451–454

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2662/2007.**

श्री विनोद पांडुरंगजी पाटील
मु. पो. पाटील ता. कारंजा (घाडगे)
जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. के. तायडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
आर्वी ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री संजय डहाके
जन माहिती अधिकारी तथा
ठाणेदार पोलीस स्टेशन कारंजा (घाडगे)
ता. कारंजा (घाडगे) जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन कारंजा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा पारडी येथील सौ. हेमलता शेषराव ढबाळे यांचे आत्महत्या प्रकरण एप्रील 2007. हेमलता ढबाळे हिचे आत्महत्या प्रकरणी फिर्यादीची पहिली खबरी व दूसरी तीचे कुटुंबातील भावानी किंवा आईने दिलेल्या फिर्यादीची प्रत व कारवाई काय झाली याची सविस्तर माहिती. या प्रकरणात समझोता झाल्याची माहितीचा अहवाल दयावा.

सदरची माहिती स्वतः हजर राहून घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 17.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 24.9.2007 रोजी अपीलकर्ता यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी आर्वी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु दि. 26.2.2007 च्या अर्जाच्या संदर्भातील अहवाल मात्र उपलब्ध झाला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सदरच्या प्रकरणात जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीचे कागदपत्र अपीलकर्ता यांना संपूर्ण उपलब्ध करुन दिले आहे. ज्या अहवालाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी माहिती मागितली त्या अहवालाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी विशिष्ठ तारीख दिलेली नसल्यामुळे अहवालाच्या संदर्भात कागदपत्र शोधून उपलब्ध करुन देता आले नाही. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक 12.9.2007 रोजी अतिरिक्त माहितीच्या करीता खर्चाचा भरणा करण्यास सांगितले होते व तो त्यांनी केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरचा अहवाल नस्तीमध्ये नसल्यामुळे त्याबाबत संबंधित तपास अधिकारी यांना विचारणे आवश्यक आहे. परंतु त्यांची बदली झालेली असल्यामुळे त्यांना विचारुन

माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत तपास अधिकारी यांना विचारुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी आर्वी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

सविनय सादर आहे की पो.स्टे.कारंजा घा. येथे दि. 25.2.07 ला वैद्यकीय अधिकारी कारंजा हयांनी मेमो दिला की दि. 25.2.07 चे 11.15 वा. सौ. हेमा शेषराव ढबाले वय 22 वर्ष रा. पारडी हिला भरती करण्यात आले आहे. अशा मेमो वरुन स्टे.डा. सा. नं. 15/07 वेळ 12.05 वा. नोंद घेण्यात आले व बयान घेण्यास पोउपनि एच.आर. आडे हे बयान घेण्यास कारंजा रुग्णालयात केले असता सौ. हेमा ढबाले हिला पुढील उपचार करण्यास नागपूर येथे स्थानांतर करण्यात आले होते. त्यावरुन ते पो.स्टे.ला परत येवून सा.नं. 17/07 वेळ 12.30 वा. नोंद घेतली आहे. नागपूर येथे मेडिकल कॉलेजला स्थानांतरण करण्यात आल्याने तिथे वैद्यकीय अधिका–याने तिला 13.45 वा. चेक करुन ती मरण पावल्याबाबत मेमो दिल्याने पो.स्टे.अजनी नागपूर येथे मर्ग क्र. 00/07 कलम 174 जा.फौ. मृतक सौ. हेमा शेषराव ढबाले वय 22 वर्ष रा. पारडी हिचा दि. 25.2.07 चे 15.15 वा. नोंद करण्यात आला. तिथे इन्क्वेस्ट पंचनामा व शव विच्छेदन होवून सदरचे कागदपत्र पो.स्टे. कारंजा येथे दि. 27.2.07 ला 21.50 वा.प्राप्त झाल्याने मर्ग क्र.04/07 कलम 174 जाफौ मृतक सौ. हेमा शेषराव ढबाले चा नोंद करुन तपासात घेतला. त्यामध्ये मृत्यूचे कारण विषारी औषध प्राषन केल्याचे नमुद आहे.

सदर मर्गचे एकंदरीत तपासात यातील मृतक सौ. हेमा हिचे लग्न सन 2003 मध्ये शेषराव पांडूरंग ढबाले रा. पारडी हयाचे सह झाले. त्यापासून त्यांना अडीच वर्षाची दिप्ती नावाची मुलगी आहे. मृतकाचे कुटूंबात सासू, सासरे असे एकत्र राहात होते. मृतकाचे पतीने गावात सिमेंट विक्रिचे दुकान लावले होते व त्यांचेकडे शेती असल्याने किटक नाशक औषधी होती. मृतक ही बीए 1 पावेतो शिकली होती व तापट स्वभावाची

होती. दि. 24.2.07 ला मृतकाने मुलगी दिप्ती हिला मारपिठ केल्याने तिला कां मारले म्हणून तो बोलला होता. दि. 25.2.07 ला सकाळी मृतकचे पती गावात गेला असता 9. 30 वाजता सुमारास मृतकने घरीत विष प्राशलन केले. त्यास गावात माहिती झाल्याने तो घरी येवून रुग्णालयात घेवून गेले. घटनास्थळी बेड खाली ''फासकिल'' कंपनीचा किटनाशक औषणी मिळून आल्याने ते जप्त करण्यात आले. मृतकला नागपूर येथे नेतांना मृतकचे आई वडील हजर होते. मृतकचे शव विच्छेदन व अहवालामध्ये opinion reserved, waiting for chemical analysis report असे अहवाल दिले. त्यामुळे दि. 16.3.07 ला व्हिसेरा बाटल व विषाची बाटली सि.ए. नागपूर येथे दाखल करण्यात आली.

दि. 27.3.07 ला पंढरीनाथ लहानू बोडखे हयांनी लेखी तक्रार साक्षीदार केशव रामाजी पांदे, कृष्णाजी तुकाराम बोडखे चे पो.स्टे.ला दिली ज्यात माझी मुलगी अचानक विष पिवून मरण पावली. त्याबद्यल आम्हाला काही तक्रार करायची नाही असे लेखी दिल्याने स्टे.डा.सा.नं.35/07 वेळ 17.40 वा. नोंद करण्यात आले व दि. 28.3.07 ला पंढरीनाथ लहानू बोडखे हयांनी कार्यकारी दंडाधिकारी कारंजा घा. यांचे कडील शपथपत्र पो.स्टे.ला आणून दाखल केले.

विनोद पांडूरंग पाटील हयांनी अपीलीय अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी आर्वी हयांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम (1) अन्वये दि. 5.9.07 चा अर्ज आम्हास दि. 5.9.07 ला प्राप्त झाला व त्यामध्ये '' मौजा पारडी येथील सौ. हेमा शेषराव ढबाले वय 24 वर्ष आत्महत्या प्रकरणी फिर्यादीची पहीली खबर, दुसरी मृतकाची नातेवाईकांनी दिलेली फिर्यादीची प्रत व त्यावर कार्यवाही झाली त्यांची बयानासहित सविस्तर माहिती आणि समझोता झाल्याची माहितीचा अहवाल मागितला होता. त्यावेळेस आमचेकडे दि. 13.8.07 ला मर्ग क्र. 4/07 कलम 174 जा.फौ. मृतक

सौ. हेमा शेषराव ढबाले हिची समरी मंजूरी करीता कार्यालयात प्राप्त झाली होती. त्यावरुन विनोंद पांडूरंग पाटील हयास आमचे जा.क्र. उविली/उविपोअ/माअ/1389/07 दि. 12.9.07 ला त्यांना पत्र पाठवून कागदपत्राच्या प्रती घेवून जाण्यास कळविले. त्यांना पत्र दि. 13.9.07 ला प्राप्त झाले व त्यांनी दिनांक 14.9.07 ला पो.स्टे.आर्वी येथ जिईएन पावती क्र. 7666228 अन्वये रु 84/– भरले व आमचे कार्यालयातून दि. 24.9.07 ला संपूर्ण मर्ग समरी ज्या 1 ते 42 पाने देण्यात आले.

यातील अपीलकर्ता हा बहुजन समाज पार्टीचा कार्यकर्ता असून त्यास उपजिविकेचे कोणतेही साधन नाही. तो बौध्द समाजाचे लोकांना भडकाविण्याचे काम करुन सार्वजनिक शांततेला बाधा पोहचविण्याचे काम करतो. पो.स्टे.कारंजा येथे सन 1989 ला त्यांची सि नोटस उघडण्यात आली असून त्यांचेवर आजपर्यंत पो.स्टे.कारंजा येथे (1) अप.क्र. 84/88 कलम 324,337,34 भादवी (2) अप.क्र. 127/88 कलम 147,148,336,427 भादवी (3) अप.क्र. 128/88 कलम 147,148,149,353,332,307, भादवी (4) अप.क्र. 9/88 कलम 294,323,506 भादवी (5) अप.क्र. 169/96 कलम 307, 34 भादवी सहकलम 27 भा.ह.का. (6) अप.क्र. 130/06 कलम 143,147,447,504,506,109, भादवी (7) इस्तेगासा क. 5/88 कलम 107, 116 (3) जाफौ. (8) इस्तेगासा क. 13/88 कलम 151 (3) जाफौ. (9) इस्तेगासा क्र. 19/88 कलम 151(3) जाफौ. (10) इस्तेगासा क्र. 2/89 कलम 56 मुपोका. (11) इस्तेगासा क्र. 27/06 कलम 107, 116(3) जाफौ. प्रमाणे नोंद आहे.

सन 2006 ला विनोद पाटील हयाने पारडी येथील सरपंच सौ. शिलाताई संतोष श्रीराम हिला भडकावून जि.प.मुख्याध्यापिका सौ.गिरी व कु. प्रधान हयाचे विरुध्द सरपंच हि अनुसूचीत जातीची असल्याने तिला धज फडकावू दिला नाही म्हणून अ.जा.ज.अ.प्रति. कायदा अंतर्गत कार्यवाही करावी असे अर्ज देण्यास लावले. चौकशीत मुख्याध्यापिका

हिने सरपंच हिला शाळेचे ध्वजारोहण करण्यास 26.1.06 चे 07.00 वा. उपस्थित राहण्यास निवेदन व प्रत्यक्ष भेटून सांगितले असतांना ती हजर न झाल्याने 7.45 वा. मुख्याध्यापीकेने 7.45 वा. ग्राम शिक्षण समितीचे सदस्य श्री देविदास केवटेचे हस्ते ध्वजारोजण केले.

तसेच पोलीस अधीक्षक वर्धा हयाचेकडे विनोद पाटील हयाने स्वतः अर्ज करुन दि. 4.10.06 ला ठाण्यातून हरीचंद्र नामदेव टिपले रा. पारडी हयास बेपत्ता केल्याने पालीसावर कार्यवाही करा अशा आशयाचे अर्ज दिलेत. चौकशीत दि. 4.10.06 ला पोलीसांनी हरीचंद्र टिपले यास ठाण्यात बयानासाठी बोलावून परत पाठविले असता विनोद पाटील हयाने त्यास गाठून 100/– देवून तू एक महिना गावाल येवू नको. रिस्तेदाराकडे राहा मी पोलसा विरुध्द तक्रार करतो म्हणून पाठवून दिले व त्याने कारंजा पोलीस विरुध्द तक्रार केली परंतू सदर व्यक्ती 7 दिवसात धरी परत आला व विनोद पाटलाचे कृत्य सांगितले. तसेच सदर व्यक्तीने श्री संत भाकरे महाराज आश्रमशाळा सारवाडी प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी एमपल्लीवार करंजाचे ठाणेदार श्री कुहीकर यांना त्वरीत बडतर्फ करुन कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत तक्रार केली आहे. ज्या प्रकरणात पोलीसांनी अप. क्र. 3009/07 कलम 354,509,323,34 भादवी अंतर्गत अपराध नोंद केला होता.

तसेच सदरचे मर्ग क्र. 4/07 कलम 174 जाफौ मृतक सौ. हेमा शेषराव ढबाले हिचे पती शेषराव पांडूरंग ढबाले हयास विनोद पाटील हयाने दि. 1.3.07 किंवा 2.3.07 ला एकांतात गाठून सदर प्रकरण मिळविण्यास रु. 10000/– ची मागणी केली परंतू त्याने दिले नाही समोर पाहू म्हणाला.

दि. 25.11.08 ला पारडी 19 लोकांचे सहयाचे अर्ज ज्यात श्री मोहन वामन टिपले उपसभापती पं.स.कारंजा, ओमप्रकाश ज. मनवर माजी उपसरपंच व इतरांचे सहयाचे

अर्ज मा. पोलीस अधीक्षक वर्धा हयाना सादर केले. ज्यात विनोद पांडूरंग पाटील रा. पारडी हा गावातील राजकिय हेतू ठेवून विरोधकांना फसविण्याचे प्रयत्न करतो व गावातील लोकांना जिवन जगणे कठीण झाले आहे व गावातील शांताता भंग होवू शकते असे कळविले आहे.

एकंदरीत यातील अपीलकर्ता यास उपजिविकेचे असे कोणतेही साधन नसल्याने तो राजकिय पक्षाचे आश्रय घेवून लोकांना तसेच पोलीसावर दबाव तंत्राचा वापर करुन लोकांकडून आर्थीक बाबतीत आपला हेतु साध्य करतो. सदर प्रकरणात सुध्दा मृतकाचे पतीला रु. 10000/– ची मागणी केली परंतू त्याने दिले नाही. यातील अपीलकर्त्यास आम्हास पो.स्टे.कडून प्राप्त झालेल्या कागदपत्राच्या संपुर्ण प्रती मुदतीपुर्व दिल्या आहेत. करीता सदरचा अहवाल सविनय सादर आहे.

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांच्या हेतूबद्यल सुध्दा तक्रार केलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे चौकशी करुन माहिती उपलब्ध झाल्यास तसे कळविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी सांगितल्याप्रमाणे दि. 18.5.2007 रोजीच्या अर्जाच्या संदर्भात अहवाल उपलब्ध झाल्यास व्यक्तीशः त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.455–461

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1774/2007.**

श्री वसंत गोविंदराव बोंदरे
8/18/9 कोराडी कॉलनी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. बी. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, गोलबाजार,
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री सो. न. बालपांडे
जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव
के.टी.पी.एस.एम्लॉईज केंडीट को.ऑप.सो.कोराडी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी

हजर आहेत. अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. आर. एन. सेन उपस्थित. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने ॲड. श्री राजु ढोबळे उपस्थित. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. अमीत जोशी उपस्थित.

2. अपीलकर्ता यांनी अध्यक्ष/सचिव के.टी.पी.एस.एम्लॉईज केंडीट को.ऑप.सो. कोराडी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती दि. 4.9.06 रोजी व्यवस्थापक यांनी देण्याचे नाकारलेले दिसून येते. दि. 24.1. 2007 रोजी अपीलकर्ता यांना 75 पुष्ठे छायांकीत प्रती पुरविण्यात आलेल्या दिसून येतात. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द दि. 26.2.2007 रोजी अपीलकर्ता यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 29.12.2006 रोजी अपीलकर्ता यांना अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास कळविलेले दिसून येते. दि. 27.2.2007 रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास योग्य शुल्क आकारुन पुरविण्यात यावी व सदर प्रकरणाचा निपटारा उलटटपाली करावा व सदरच्या अहवालाची एक प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. व त्या निर्णयाच्या विरुध्दच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. दिसून येते.

3. सदरच्या अपीलाच्या प्रकरणी आतापर्यंत 8.6.2008, 17.7.2008, 17.7.2008, 2.9. 08, 8.9.08 व 6.10.08 अशा प्रकारे सुनावण्या झालेल्या आहेत. परंतु दि. 9.2.2009 रोजी झालेल्या सुनावणीत उत्तरवादी यांचे वकील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा अधिनियम डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बॅंक यांनी दाखल केलेल्या याचीका क्र. 5666/07 मध्ये सहकारी संस्थांना अधिनियम लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ मध्ये दिलेला असल्यामुळे व के.टी.पी.एस.एम्लॉईज केंडीट को.ऑप.सो.कोराडी ही पतसंस्था सहकारी संस्था असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा पतसंस्थेस सुध्दा लागू होणार नाही. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.2.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.462–464

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2671/2007.**

श्री मधुकर नागोरावजी सेनग्रफवार

144, दत्तात्रय नगर, नागपूर 24

पोष्ट अयोध्यानगर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सी. एस. डहाळकर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अपर जिल्हाधिकारी

नागरी जमीन कमाल धारणा नागपूर

2) श्री पी. पी. सोनारे

जन माहिती अधिकारी तथा

सहा. नगर रचनाकार

( नागरी जमीन कमाल धारणा ) जिल्हाधिकारी कार्यालय

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.7.2007 रोजी जन माहिती अधिकारी अतिरिक्त सक्षक अधिकारी नागरी जमीन कमाल धारणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहितीचा विषय – स्व. श्रीमंत राणी अन्नपुर्णाबाई रघुजीराव भोसले यांच्या मौजा सक्करदरा भूमापन क्र. 11 व 27 ते 32 मधील अतिरिक्त घोषित जमिनीवर शासनाने दि. 7.2.97 च्या आदेशान्वये मंजूर केलेल्या तळेगाव दाभाडे धर्तीवरील भूखंड विकास योजना राबवितांना निर्धारित केलेल्या अटी व शर्ती पालन न करणेबाबत.

1. शासनाने 7.2.97 च्या आदेशान्वये मंजूर केलेल्या तळेगाव दाभाडे धर्तीवरील भूखंड विकास योजना राबवितांना दि. 7.2.97 च्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे जमीनधारकाकडून पालन करण्यात आले आहे काय?

2. दि. 7.2.97 च्या आदेशातील परिच्छेद क्र.15 अन्वये जमीनधारकाने गृहनिर्माण सहकारी संस्थेची स्थापना केली आहे काय?

3. भाग्यश्री गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना डावलून गैरसभासदांना केलेले प्लॉटचे वाटप हे आपले दि. 15.5.99 च्या आदेशातील परिच्छेद क्र.7 मधील निर्देशानुसार योग्य झाले आहे काय? नसल्यास आपले कार्यालयातर्फे जमीन मालकाविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्याचे प्रस्तावित आहे.

4. जमीनधारकाने केलेले किती प्लॉटचे वाटप नियमानुसार बरोबर आहेत.

सदरची माहिती साध्या टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.8.2007 रोजी अपेक्षिलेली माहिती जमीनधारकाकडून प्रगती अहवाल मागितलेली आहे. त्याअनुषंगाने माहिती प्राप्त होताच आपणास माहिती देण्यात येईल. करिता अंतरिम पत्र देण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि. 8.8.2007 रोजी अपेक्षिलेली माहितीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की आपण दि. 10.7.07 रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती ही

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) व (त्र) मध्ये नमूद स्वरुपातील नसल्याने आपणास माहिती पुरविता येणे शक्य नाही. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. निरंक अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.9.2007 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 18.9.2007 अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दि. 1.11.2007 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम करण्यात आलेला आहे. दिलेल्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. एस.एस.फिरोजखान यांनी युक्तीवाद केला. युक्तीवादामध्ये त्यांनी गृहनिर्माण संस्थेनी त्यांना प्लॉटचे वाटप केलेले नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली आहे असे सांगितले. व त्यामुळे वाटप बरोबर आहे किंवा नाही अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केलेले आहे. तसेच संस्थेला शासनानी भुखंड देतांना काही अटी व शर्ती घातलेल्या आहे व त्या अटी व शर्तीचे पालन झाले आहे किंवा नाही तसेच प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक आहे असेही आदेशात असल्यामुळे त्यांना संस्थेकडून दाखल झालेल्या प्रगती अहवालाची प्रत अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते अर्थातच अपीलकर्ता यांनी अभिप्रायात्मक प्रश्न विचारलेले असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 2 (च) मधील ‘‘माहिती‘‘ या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. व (त्र) मधे ‘‘अभिलेख‘‘ या संज्ञेच्या व्याख्येत उत्तर दिलेले आहे असे सांगितले. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती अधिकारी यांचेकडून त्यांनी भाग्यश्री गृह निर्माण सहकारी संस्थेच्या प्लॉट वाटपाच्या संदर्भात झालेल्या अनियमिततेच्या संदर्भात अभिमत मागितलेले आहे ते ‘‘माहिती‘‘ व ‘‘माहितीचा

अधिकार''या दोन संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाही. असे असले तरी अटि व शर्ती मध्ये संस्थेकडून जो प्रगती अहवाल दाखल करण्याचे बंधनकारक केलेले आहे त्या प्रगती अहवालाच्या प्रती मात्र अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून प्रगती अहवाल उपलब्ध करुन घेणे व संस्थेनी प्रगती अहवाल दाखल न केल्यास संस्थेविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक राहिल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना भाग्यश्री गृह निर्माण सहकारी संस्थेच्या भूखंड विकास योजना राबवितांना दि. 7.2.97 च्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याच्या संदर्भातील प्रगती अहवालाच्या प्रती संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.465–468

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2672/2007.**

श्री वसंत केशव तुपटे
मु. लोहारा पो. जांब
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्रीमती स्नेहा स. खेडकर
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दि. 27.12.2006 चे चौकशीचे कारणाचे प्रती मिळणेबाबत. माहितीचा कालावधी 2006–07

1. पोलीस पाटील रमेश घोडीचोर, रामकृष्ण दुनेदार, तुकाराम तुपटे, रामचंद्र माकडे

2. सुरेश कुथे, बालचंद माकडे, अनिल इसापती व सुशीला ढोंगे यांच्या बयाणाच्या सत्यप्रती.

3. 27.12.06 चे चौकशीतील निश्पन्न झालेले चौकशी अहवाल यांची सत्यप्रती देण्यात याव्या.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.2.2007 रोजी बयाण दिले त्यांनी बयाणे देतेवेळी बयाण गुप्त ठेवण्याबद्यल कळविले आहे त्यामुळे आपणास बयाणाच्या सत्यप्रती देता येणार नाही तसेच चौकशी सुरु असुन चौकशी पुर्ण झालेवर चौकशी अहवालाची प्रत आपणास देता येईल असे विहित मुदतीत कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच दि. 16.4.2007 रोजी चौकशी अहवालाच्या सत्यप्रती 7 पाने उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येतात. तत्पूर्वी दि. 16.3.2007 रोजी अपीलकर्ता यांनी विभागीय पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा झालेला दिसून येत नाही. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे दि. 16.4.2007 रोजी चौकशी अहवालाच्या सत्यप्रती देण्यात आलेल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 1 व 2 च्या प्रमाणे बयाणाच्या प्रती उपलब्ध झालेल्या नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना बयाणाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जबाब देणा–यानी सदरची माहिती ही गुप्त ठेवावी असे कळविलेले होते व म्हणून सदरच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी

सांगितले. यावरुन सद्भावनेने सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. यात माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ झालेली आहे असे म्हणता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण प्रकरणातील पाश्वभुमी व घडलेल्या घटनाच्या संदर्भामध्ये आयोगाकडे वस्तुस्थिती विषद केली परंतु आज सदरच्या फिर्यादीच्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला असल्यामुळे व तपासानंतर आरोपपत्र न्यायालयात दाखल झालेले असल्यामुळे अर्जात मागितलेल्या व्यक्तीच्या संदर्भातील बयाणाच्या प्रती हया उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत असता कामा नये व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 6.2.2007 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 व 2 च्या बयाणाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्या प्रतीच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य अपीलकर्ता यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.469–471

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 226/2008.**

श्री प्रभाकर नानासाहेब रोहनकर
मु. सुकळी (गुरव) पो. कोजाना (राजना)
ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती 444701 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक
सह. संस्था यांचे कार्यालय सहकार भवन
कांतानगर जुना बायपास रोड अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक
सह. संस्था यांचे कार्यालय सहकार भवन
कांतानगर जुना बायपास रोड अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे हजर नाहीत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा प्रतिनिधी

पाठविलेला आहे परंतु त्यांना प्रकरणातील कोणतीही माहिती दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी त्यांची बाजू मांडण्याकरीता त्यांची मुलगी नामे कु. सविता प्र. रोहनकर हिला सुनावणी दरम्यान बोलण्याची व बाजु मांडण्याची परवानगी मागितलेली आहे व ती मंजुर करण्यात आलेली आहे.

2. अपीलकर्ता यांनी विभागीय सहनिबंधक सह. संस्था यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

श्रीमान ठाकुर साहेब तत्कालीन सहा. निबंधक सह. संस्था नांदगाव खंडेश्वर यांनी कार्यालयाच्या फाईल मधून अफरातफर केलेल्या दस्तऐवज तक्रारीबाबतच्या निकालाची प्रत मिळण्याबाबत.

सदरची माहिती टपालाद्वारे देण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.8.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी आपल्या अर्जात नमुद श्री ठाकुर सहा. निबंधक सह. संस्था नांदगाव खंडेश्वर यांनी कार्यालयाचे दस्तऐवजा संबंधीत विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी दिनांक निरंक रोजी दिलेल्या अहवालाच्या प्रतीकरीता रु. 6 व विभागीय सहनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी दि. 5.4.2008 चे पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांना दिलेल्या पत्राकरीता रु. 4 असे एकुण रु. 10 हे पत्र टपालाने पाठविण्याकरीता रु. 5 माहिती रजिष्टर पोस्टाने पाहिजे असल्यास खर्च 25/— असु एकुण 40/— रु. या कार्यालयात नगदी शासकीय पावती घेवून, धनादेशाद्वारे भरणा करावे सदर रक्कम भरणा केल्यानंतर आपणास तात्काळ सदरची माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णया विरुध्द दि. 25.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलाचा निर्णय हा दि. 27.10.2008 रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना मागितलेली माहिती ही दस्तऐवज तक्रारीबाबतच्या निकालाची कार्यालयाच्या फाईल मधून अफरातफर केल्याबाबतची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती. परंतु सदरच्या निर्णयाची प्रत न देता किंवा त्याबाबतचा उल्लेख न करता दि. 22.8.08 च्या अर्जामध्ये जी कागदपत्रे अगोदरच त्यांचेकडे आहे त्या कागदपत्राच्या खर्चाचा भरणा मागितलेला आहे व त्यामुळेच त्यांनी विभागीय उपनिबंधक यांना भेटुन ज्या अहवालाचा किंवा कागदपत्राचा उल्लेख दि. 22.8.2008 च्या तक्रारीत केलेला आहे ती कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध आहे. परंतु त्यांना विभागीय चौकशीच्या निकालाची प्रत अपेक्षित आहे. परंतु तरीसुध्दा त्याची दखल घेतलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.9.08 रोजी सहनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा श्री दिपक ठाकुर हे राजपत्रीत वर्ग 2 अधिकारी असल्याने त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हयांना आहेत. तेव्हा अपीलार्थी यांनी मागविलेली निकालाची प्रत देणे अद्याप शक्य नाही हयाची खात्री झाल्यावरुन खालील प्रमाणे निर्णय देवून अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जात माहिती ही स्पष्टपणे मागितलेली आहे त्यात कोणत्याही प्रकारची संदिग्धता नाही असे असुन सुध्दा दिनांक 22.8.2008 रोजी जो अतिरिक्त खर्चाचा भरणा कळविण्यात आलेला आहे तो अतिशय बेजबाबदारपणाचा आहे व त्यामुळे संबंधित तत्कालीन माहिती अधिकारी विभागीय उपनिबंधक हे दोषी आढळुन येतात. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा जे विश्लेषण केलेले आहे त्याच विश्लेषणाप्रमाणे जर सुरुवातीला अपीलकर्ता यांना उत्तर दिले असते तर अपीलकर्ता यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता राहीली नसती. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक अमरावती यांनी आयोगाकडे दाखल केलेला जो खुलासा आहे तो खालीलप्रमाणे.

तक्रारदार/अपीलार्थी श्री प्रभाकर नानासाहेब रोहनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 दि. 14.8.2008 चे अर्जान्वये, तत्कालीन सहा. निबंधक सहकारी संस्था नांदगाव खंडेश्वर यांनी कार्यालयाच्या फाईलमधुन अफरातफर केलेल्या दस्तऐवजा संबंधाने, तक्रारी बाबतच्या निकालाची प्रत मिळणे बाबत माहिती अधिकारी, विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांचेकडे विनंती केली. सदरहू अर्जानुसार माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदरचे माहिती संबंधाने कागदपत्र देणेस्तव एकुण रु. 40 नगदी भरणा करणे संबंधाने सुचित केले असता अपीलार्थी यांनी सदर पत्राने व्यथीत होवून अपील हया कार्यालयास दि. 26.9.08 रोजी सादर केले होते.

प्रकरणात दि. 27.10.2008 रोजी सुनावणी ठेवण्यात येवून संबंधितास सुनावणी नोटिस पाठविण्यात आली. दि. 27.10.2008 रोजी अपीलार्थी व गैरअपीलार्थी हजर झालेत. अपीलार्थी यांनी श्री दिपक ठाकुर तत्कालीन सहा. निबंधक सहकारी संस्था नांदगाव खंडेश्वर यांचे कामकाजाबाबत चौकशी करुन अहवाल विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाचे आधारे विभागीय उपनिबंधक सह. संस्था यांनी केलेल्या/करत असलेल्या कार्यवाहीची/निकालाची प्रत मिळणेस विनंती केली.

अपीलार्थी यांचे अपील क्र. 20/2008 हया कार्यालयाचे आदेश दि. 27.10.2008 अन्वये आवश्यक कारणमिमांसेसह फेटाळण्यात आले आहे. तथापी प्रकरणातील वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

श्री दिपक ठाकुर तत्कालीन सहा. निबंधक सहकारी संस्था नांदगाव खंडेश्वर यांचे कामकाजाबाबत प्राप्त तक्रारीवर चौकशी करुन चौकशी अहवाल विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी सादर केला. तसेच जिल्हा उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांचे पत्र दि. 13.8.2008 अन्वये प्रशासकीय अहवाल प्राप्त झाला. सदर प्रशासकीय अहवालाचे निरीक्षण केले असता तत्कालीन सहा. निबंधक सहकारी संस्था

नांदगाव खंडेश्वर याचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 अन्वये जिल्हा उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांचेकडून शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेस्तव प्रस्ताव हया कार्यालयाचे पत्र दि. 9.9.2008 अन्वये मागविला असता जिल्हा उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांचे पत्र दि. 9.2.2009 अन्वये सदरहु प्रस्ताव हया कार्यालयास प्राप्त झाला आहे. श्री दिपक ठाकूर हे राजपत्रीत वर्ग 2 अधिकारी असल्याने त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हयांना आहेत. सदरहु प्रस्ताव मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 नियम 8 (3) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करणेस्तव हया कार्यालयाचे पत्र दि. 12.2.2009 अन्वये शिफारशीसह सादर करण्यात आला आहे.

श्री दिपक ठाकूर हे राजपत्रीत वर्ग 2 अधिकारी असल्याने त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हयांना असल्याने हया कार्यालयाकडुन होत असलेल्या कारवाईची प्रत/माहिती तक्रारदार यांना देणे शक्य नसल्याने त्यांचे हया कार्यालयाकडील अपील क्र. 20/2008 हे फेटाळण्यात आले आहे. तथापी उपरोक्त वस्तुस्थितीस अनुसरुन तक्रारदार यांची तक्रार नस्ती करण्याचे विनंतीसह खुलासा सादर करण्यात येत आहे.

सदर तक्रारी संबंधाने आयोजीत सुनावणीस दि. 17.2.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिका–याचे वतीने उपस्थित राहण्यास व खुलासा सादर करण्यास श्री व्ही.डी. कहाळेकर विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरच्या खुलाशाप्रमाणे दि. 9.2.2009 रोजी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला असे जे निदर्शनास आणले त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यापूर्वीच प्रशासकीय अहवाल प्राप्त झाला होता व तो त्यांचे जवळ आहे परंतु अशी कोणतीही

प्रक्रिया असली तरी माहिती अधिकारी यांनी अर्जदारास योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. परंतु दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष पुन्हा काढता येतो. माहिती ही जेव्हा अर्जदार मागतो त्यावेळेस योग्य ती माहिती त्यांना देण्यात येत नाही मात्र आयोगाकडे खुलासा करण्यात येतात. खुलाशाप्रमाणे निर्णय होत नाही तर प्रत्यक्ष अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देतांना कोणती माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यावरुन निर्णय होत असतात व त्यामुळे अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्चाचा पैसा भरावयास सांगून दिशाभूर करणारी माहिती दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (5) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करुन देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित राहून आयोगाचे निदर्शनास आणणे आवश्यक असते अन्यथा अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत याची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. प्रतिनिधी पाठवून निर्णय होत नसतात. व ही बाब सुध्दा विभागीय सहनिबंधक यांनी नोंद घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी दि. 14.8.2008 च्या अर्जामध्ये मागितलेल्या निकालाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. किंवा त्याबाबत वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना विनामुल्य कळविण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सह. संस्था अमरावती यांनी दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता यांना कारण नसतांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागल्यामुळे त्यांना अमरावती ते नागपूर येथे येण्याजाण्याचा खर्च माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत स्वतःच्या खिशातून द्यावा.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.472–478

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 814/2008.**

डॉ. सौ. वि. वि. भुतडा
रा. महाराष्ट्र बॅंकेच्यावर, अयोध्यानगर
16 जुना सुभेदार लेआउट, शारदा चौक नागपूर ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. जाधव
जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी
राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय
महात्मा गांधी स्मारक रुग्णालय तिसरा मजला
डॉ. एस.एस.राव रोड परेल मुंबई 400 012. ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 18.2.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 25.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 25.11.2008 रोजी अपील क. 653/2008 च्या दिनांक 30.8.2008 च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार आहे. परंतु प्रत्यक्ष प्रतिज्ञापत्रात मात्र विश्लेषण करुन तक्रार दाखल केलेली आहे. व प्रार्थनेमध्ये

सुध्दा कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे अपेक्षित नाही. अपील क्र. 653/2008 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 मध्ये दि. 12.12.2007 च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु आदेशाप्रमाणे दि. 12.12.2007 च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणकोणत्या मुद्याची माहिती उपलब्ध करुन द्यावी असेही स्पष्ट केले आहे. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तक्रारीचा खुलासासुध्दा केलेला नाही. तक्रारीच्या सुनावणीच्या अंती तक्रारदार यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की संचालक (प्रशासन) रा.का.वि.योजना मुंबई यांनी दिनांक 22.11.2006 रोजी सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे राज्य कामगार विमा योजना अंतर्गत पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम या संदर्भामध्ये पत्र दिलेले दिसून येते. त्या पत्रातील परिच्छेद क्र. 2 मध्ये डॉ. श्रीमती भुतडा यांच्या संदर्भामध्ये अभ्यासक्रमाच्या कालावधीत देण्यात आलेल्या वेतन व भत्यावर रु. 3,34,833/- इतका खर्च झालेला आहे असे वैद्यकीय प्रशासन अधिकारी रा.का.वि.योजना नागपूर यांनी कळविले आहे. व सोबत प्रत सलग्न असे नमुद केले आहे. त्यावरुन वैद्यकीय प्रशासन अधिकारी रा.का.वि.योजना नागपूर यांनी कळविलेल्या पत्राच्या प्रतीची छायांकीत प्रत तक्रारदार यांना उपलब्ध झाल्यास त्यांना माहिती उपलब्ध झाल्यासारखी होईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या पत्राची छायांकीत प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील नस्तीमध्ये नसल्यास सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालयातून पत्राचा संदर्भ देवून सदरच्या पत्राची प्रत मागवून घेवून तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना संचालक (प्रशासन) रा.का.वि.योजना मुंबई यांनी सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मुत्रालय मुंबई यांना दि. 22.11.2006 रोजी दिलेल्या पत्रातील परिच्छेद क्र. 2 मध्ये वैद्यकीय प्रशासन अधिकारी रा.का.वि.योजना नागपूर यांनी कळविलेल्या पत्राची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. शासनाकडे सादर झालेली असेल तर शासनाकडून मागवून उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.478–480

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे किरकोळ अर्ज क्रमांक 1/2009.**

जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद धामणगांव रेल्वे
ता. धामणगांव रेल्वे जि. अमरावती .... **अर्जदार**

**( आदेश पारित दिनांक 18.2.2009 )**

**नि र्ण य**

अर्जदार यांनी दिनांक 29.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे किरकाळ अर्ज दाखल केलेले आहे. सदरच्या किरकोळ अर्जाची सुनावणी आज घेण्यात आली. अर्जदार हजर आहेत.

2. अपील क्र. 858/2007 मध्ये दि. 14.1.2008 रोजी निर्णय देण्यात आला असून आदेश क्र. 1 मध्ये निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होत असल्याने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल करावा असे आदेश दिलेले आहे. सदरच्या आदेशाप्रमाणे तत्कालीन माहिती अधिकारी यांनी दिनांक 29.1.2008 रोजी खुलासा दाखल केलेला आहे. दाखल केलेल्या खुलाशामध्ये दि. 14.1.2008 रोजी माध्योनोत्तर मुख्याधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला. कार्यभार स्विकारल्यानंतर सदरचे अपील असल्याची बाब माझ्या निदर्शनास आली. परंतु

वेळेत नागपूरात पोहोचणे शक्य नसल्याने मी उक्त दिनांकास उपस्थित राहू शकलो नाही. परंतु तत्कालीन मुख्याधिकारी यांनी माहितीचा शोध घेतला असता माहिती उपलब्ध न झाल्याने दि. 7.7.2006 ला मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. मात्र त्यावेळी त्यांनी मनिऑर्डर द्वारे पाठविलेले रु. 25 कार्यालयातर्फे त्यांना परत करण्यात आली नाही ही बाब खरी आहे. सदरचे रु. 25 रक्कम मनिऑर्डर द्वारे त्यांना परत करण्यात आली आहे. पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर प्रकरणी माहिती संबंधाने पुन्हा शोध घेतला असता माहिती उपलब्ध न झाल्याने माहिती पुरविता येत नाही असे कार्यालयीन पत्र क्र. 554 दि. 29.1.2008 अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे शास्ती लादण्यात येवू नये असा त्यांनी खुलासा केला आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 26.4.2006 रोजी जी मागितलेली होती त्या माहितीचा कालावधी I मे जुन 1987 जिल्हाधिकारी यवतमाळ (उपजिल्हाधिकारी रोहयो यवतमाळ) यांनी पाठविलेल्या एल.पी.सी.ची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते. माहिती 1987 ची असून अपीलकर्ता ती 2006 मध्ये मागत आहेत. व त्यामुळे ती उपलब्ध असेलच असे नाही. त्यातही सदरची माहिती ही कायम जतन करण्याची नाही व त्यामुळे उपलब्ध नाही असे कळविलेले आहे असे विद्यमान माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच ही बाब दि. 7.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील क्र. 458/07 मधील आदेश क्र. 1 बाबीचा खुलासा मान्य करण्यात येवून जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून सदरचा पुनर्विलोकन अर्ज हा मान्य करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) सदरचा पुनर्विलोकन अर्ज मान्य करण्यात येत असून अपील क्र. 458/07 मधील आदेश क्र. 1 हा रद्द करण्यात येत आहे.

2) अर्जदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.2.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.481–483

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 1/2009.**

श्री भानुदास सुर्यभान उंबरकार
मु. पो. बेलखेड ता. तेल्हारा
जि. आकेला ..... **तकारकर्ता**

**विरुध्द**

1) मुख्याध्यापक/प्राचार्य नुतन विद्यालय बेलखेड
ता. तेल्हारा जि. आकेला
2) शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अकोला ..... **गैरतकारदार**

**( आदेश पारित दिनांक 18.2.2009 )**

**नि र्ण य**

तकारदार यांनी दिनांक 5.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे तकार दाखल करुन अपील क. 524/07 मध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी अपीलकर्ता अर्जदार यांच्या अर्जाच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी अधिकारी नियुक्त करुन दिनांक 16.10.2007 पासून एम महिन्याचे आत तसा अहवाल आयोगास सादर करावा असा निर्णय दिला होता. परंतु सदरचा चौकशी अहवाल हा आयोगाकडे सादर केलेला दिसून येत नाही व त्यामुळेच तकारदार यांनी आयोगाकडे तकार दाखल केलेली आहे. तकारीच्या संदर्भामध्ये शिक्षण उपसंचालक यांनी आयोगाकडील दि. 25.8.2008 च्या पत्रा प्रमाणे खुलासा मागविलेला दिसून येतो व त्या पत्राप्रमाणे दि. 6.9.08 रोजी शिक्षण

उपसंचालक अमरावती यांनी खुलासा दाखल केलेला आहे. परंतु खुलासा दाखल केलेला असला तरी अर्जदार अपीलकर्ता यांच्या दि. 15.4.2006 च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही व माहिती उपलब्ध करुन देण्यास कोण जबाबदार होते असा निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र त्याबाबत अहवालाची प्रत आयोगा समोर जी आहे त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार कोण होते ही बाब स्पष्ट होत नसल्यामुळे विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी पुढील तारखेस सदरची बाब स्पष्ट करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अर्जदाराचा अर्ज हा अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून विभागीय शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना दि. 1.4.2009 रोजी दु. 1.30 वा. उपस्थित राहण्यास व खुलासा सादर करण्यास कळविण्यात यावे.
2) तक्रारकर्ता व विभागीय शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.484–485

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 10/2008.**

श्री चंद्रकांत शंकरराव देशमुख
प्लॉट नं. 220, रविनगर चौक
टमरावती रोड नागपूर 440033. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर
2) श्री राजेंद्र अहिवर
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सर्व्हे नं. 235/1 हयाचे वर्ग 1 मध्ये रुपांतर बाबत सादर प्रकरणामध्ये नेमक्या कोणत्या त्रुटया आहेत त्यांची सविस्तर माहिती.

2. प्रकरण पुर्तते करीता तहसिलदार हयांचेकडे परत पाठविल्याची तारीख

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.12.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीचे अपील हे मान्य करण्यात आलेले दिसून येते. व दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती 7 दिवसाचें आंत निःशुल्क पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले आहे. परंतु त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे दि. 15.10.2007 रोजी उपविभागीय अधिकारी काटोल यांनी सोंनल राजे मानसिंहराजे भोसले यांना त्रयस्थ पक्षाची माहिती आहे म्हणून संबंधितास पुरवावी किंवा कसे याबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे असे पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने सौ. सोंनल राजे मानसिंहराजे भोसले यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती असली तरी गोपनीय नसल्यामुळे तथा सार्वजनिक हिताची वा आपलेच कार्यालयाचे कामकाजाशी संबंधित असल्या कारणास्तव संबंधित माहिती ही अर्जदारास पुरविण्यास हरकत नाही असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी सुध्दा अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दि. 5.11.2007 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते सदरची माहिती ही त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने नाही व

त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी काटोल हे दोषी आढळुन येतात. सदरचा अधिनियम 2005 मध्ये अंमलात आला व 2007 मध्ये सुध्दा जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी काटोल किंवा त्यांचे कार्यालयात सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंलमबजावणीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती आहे असे दिसून येत नाही. अधिनियमातील कोणत्याही प्रकारच्या मुदतीचे पालन केलेले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी काटोल यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.491–494

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 7/2008.**

श्री आर. जी. शंकावार
न्गीनाबाग चोखामेळा मुलीच्या वस्तीगृहाजवळ
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता
पाटबंधारे उपसा सिंचन विभाग चंद्रपूर (सर्कल)
ता. जि. चंद्रपूर
2) श्री ए. बी. मुरडीव
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
उपसा जलसिंचन उपविभाग
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.9.2007 रोजी राज्य शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उपसा जलसिंचन यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. आपल्या नावाने (खात्याच्या) तळयाची पाळ मौजा जुनोना येथील नावाने नसतांना आपण आपल्या खात्याचे (महसुल) विभागावर मोजणी साठी 2250 रु. 14.6.2007 ला भरण्याचा अधिकार आहे का. 2. आपल्या विभागामध्ये एकुण किती तलाव आहे. तलावाचे नाव देणे 3. शासनाचा हमीरोजगारीचा पैसा सोडता (नियमीत) तलाव व नहर दुरुस्तीसाठी किती पैसा शासनानी दिला आणि कोणत्या तलावावर व नहरावर खर्च केला यांची सविस्तर माहिती देणे 4. सर्व तलावाच्या मंजूराकउून काम करुन घेतले त्या (मस्टर) हजरीपत्रकावर मजूराच्या ख–या सहया आहे काय याची प्रत देणे.

सदरची माहिती स्वतः घेवून जाणार किंवा टपालाने खालील पत्यावर पाठविणे असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.9.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.10.2007 रोजी सहा. अधिक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 3.12.2007 रोजी अपीलकर्ता यांना सविस्तर माहिती त्यांच्या मुद्याप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये पाहिजे ती माहिती दिली नाही. तळयाच्या पाळीवर व नहरावर खर्च दाखविलेला आहे परंतु

मोक्यावर प्रत्यक्ष काम करण्यात आले नाही असे नमुद केलेले आहे. परंतु त्याकरीता अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा पुरावा दाखल केलेला नाही व विषयवार खुलासेवार माहिती देण्यात यावी असे म्हटलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.495–497

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 15/2008.**

श्री सहादेव तंजूजी रिठे
मु. हुडपा पो. अडम ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कुही
ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2007 रोजी शासकीय राज्य माहिती अधिकारी तहसिलदार कुही यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदार महादेव तंदुजी रिठे यांची मौजा हुडपाशिवार प ह न खाते 398 (3.34 हे.आर) भोगवटा वर्ग 2 सामुहिक शेतीची नियमबाहय खरेदी विक्री तसेच महसूल नियमात बासनात बांधून वर्ग 2 च्या शेतीचा फेरफार क्र. 239 ता. 31.5.2007 ला दिशाभूल केल्या प्रकरणी. आपले स्पष्टीकरण व दोषीवर काय कार्यवाही करण्यात आली.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.8.2007 रोजी तहसिलदार कुही यांनी माहिती उपलब्ध झाली आहे त्याकरीता रु. 12 अतिरिक्त खर्च म्हणून भरणा करावा व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2007 रोजी रु. 12 चा चलानद्वारे भरणा केलेला दिसून येतो. व त्याच दिवशी अपीलकर्ता यांना सहा प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नव्हती म्हणून त्यांनी दि. 13.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे दि. 18.9.2007 रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे दि. 21.9.2007 रोजी तहसिलदार कुही यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली असल्यामुळे व त्यात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कळविलेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये अर्जदार महादेव तंदुजी रिठे यांची मौजा हुडपाशिवार प ह न खाते 398 (3.34 हे.आर) भोगवटा वर्ग 2 सामुहिक शेतीची नियमबाहय खरेदी विक्री तसेच महसूल नियमात नसून वर्ग 2 च्या शेतीचा फेरफार क्र. 239 ता. 31.5.2007 ला दिशाभूल केल्या प्रकरणी तसेच नियमबाहय विक्री व फेरफार रद्य करणे अशी विनंती केलेली आहे.

3. अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांची मागणी ही नियमबाहय विक्री व फेरफार रद्य करणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात

निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कारवाई करण्याची तरतुद नाही व त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार किंवा अपील दाखल करुन न्याय मिळवून घेणे अपेक्षित असते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी म. ज. म. अ. सं. 1966 च्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपील दाखल करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 21.7.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.498–500

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 20/2008 व 24/2008.**

श्री विलास गणपतराव दलाल
राजाजी वार्ड रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. बलविर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय (करमणूक कर विभाग)
नागपूर
2) श्री चंद्रशेखर डांगे
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी (करमणूक कर विभाग)
कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 20/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. दि. 1.1.93 ते 29.12.93 या कालावधीत त्रिमुर्ती सिनेमागृह रामटेक मधुन किती वेळा अवैध तिकीटाची विक्री केली त्याची संख्या किती? तरसहीत माहिती देण्याबाबद

2. जिल्हा कार्यालयीन 23.7.07 च्या पत्रानुसार विभागीय कार्यालय यांची 21.7.07 ची 1 ते 5 पानाची ऑर्डर मिळण्याबाबद.

सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.9.2007 रोजी अपीलकर्ता यांना दोन्ही माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.10.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व त्यात माहिती चुकीची व दिशाभूल करणारी सादर केली असे कारण दिलेले आहे. तसेच दोन नवीन मुद्ये काढुन पुन्हा कारणे विचारलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी 12.15 च्या शोची माहिती मागितलेली होती परंतु ती तशी त्यांना दिलेली नाही. त्यावर अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांनी अर्जामध्ये कोणत्याही खेळाचा उल्लेख केलेला नाही व त्यामुळे त्यांना उल्लेख केलेल्या माहिती बद्यल माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील मेमोमध्ये 30.13.1993 च्या शो कॉज नोटीस मधील माहिती खरी समजायची

काय? असा जो प्रश्न विचारला आहे तो नवीन प्रश्न आहे. कोणत्याही अपीलामध्ये नवीन माहिती उपस्थित करता येत नाही. तसेच कारणे विचारलेली असल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. जन माहिती अधिकारी यांनी विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांनी दि. 21.7.07 रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. व त्यामुध्ये सुध्दा अपीलकर्ता यांच्या संपूर्ण प्रकरणावर प्रकाश पडतो. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मा. उच्च न्यायालयाची याचिका सुध्दा सन 2000 मध्ये खारीज करण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे चे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 24/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

त्रिमुर्ती सिनेमागृह रामटेक दि. 30.12.93 च्या डी.सी.आर.व्हिजिट बुक, निरीक्षण टिपणी मधुन 12.30 च्या शो मधुन खोटे तिकिट विक्री करण्यात आली होती का?

सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.10.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.12.2007 रोजी देण्यात आलेला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे कारण दिलेले असून डी.सी.आर.व्हिजिट बुक,

तिकिट विक्री रजिस्टर 15.6.93 ची निरिक्षण टिपणी नंतर 29.12.93 ची माहिती मागितली होती परंतु प्रत्यक्षात 30.12.93 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कारण दिलेले होते. अपीलकर्ता यांनी ज्या खेळाची माहिती अर्जात मागितलेली दिसून येते त्या माहितीच्या बद्यल सुध्दा त्यांना उत्तर दिलेले दिसून येते. परंतु डी.सी.आर. व्हिजिट बुक उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की डी.सी.आर. व्हिजिट बुक व निरीक्ष टिपणीमधून 12.30 च्या शो मधुन खोटे विक्री करण्यात आली होती का याबाबत कोणत्याही प्रकारचे उत्तर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात व द्वितीय अपील मेमोमध्ये उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे प्रश्न उपस्थित केलेले आहेत ते उपस्थित करता येत नाहीत. डी.सी.आर.व्हिजिट बुक व तिकीट विक्रीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचे व्हिजिट बुक त्यावेळेस जप्त करण्यात आले होते परंतु खेळाच्या संदर्भामध्ये रोज आवश्यकता असल्यामुळे त्यांना परत करण्यात आले असावेत परंतु तशी नोंद दिसून येत नाही. माहिती 1993 ची आहे. न्यायालयात याचिका सुध्दा सन 2000 मध्ये खारीज करण्यात आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. त्यानंतर सदरचे सिनेमा थेटरसुध्दा लिलाव करुन विक्री करण्यात आली व तसा हा विषय संपला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी आज जी नस्ती जिल्हाधिकारी कार्यालयात आहे त्या नस्तीचे निरीक्षण करुन अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 20/2008 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपील क्र. 24/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी नस्ती उपलब्ध आहे त्या नस्तीचे निरीक्षण करुन त्यातील आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन द्याव्यात. त्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयीन वेळेत तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे.

3) अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळविल्यानंतर त्यावेळेस जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत नस्ती त्यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व सोबत कार्यालयीन कर्मचारी उपस्थित ठेवावा.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.501—505

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 19/2008.**

श्री नवनाथ आत्मारामजी महाजन
दत्त मंदिर रोड, रामनगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रविण वानखेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर 1
उमरेड रोड भांडे प्लॉट नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव, गांधीनगर हौसिंग सांसायटी लि.
नागपूर गांधीनगर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ..2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सचिव, गांधीनगर हौसिंग सांसायटी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
पत्र क्र. मनपान/नशक/1324 दि. 12.8.2005 नुसार लेआउटला मंजुरी दिलेली आहे. त्याकधील सोसायटी किती सभासदांना रो.नी. दि 20.6.07 पावेतो भुखंड विक्री करुन दिली आहे त्याचा तपशिल देण्याबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 9.10.2007 रोजी देण्यात आलेला असून 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश झालेले दिसून येतात. परंतु तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती का उपलब्ध करुन दिली नाही असे विचारले असता सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सहकारी गृह निर्माण संस्थेची केस ही न्यायालयात असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही परंतु न्यायालयानी माहिती उपलब्ध करुन देण्यास मनाई केलेली नाही असेही त्यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना न्यायालयात जरी केस दाखल असली तरी माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत घेता येणार नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलाच्या आदेशाची सुध्दा सचिव तथा जन माहिती अधिकारी गृह निर्माण संस्था यांनी पालन केलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 21.6.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) माहिती उपलब्ध करुन न दिल्यास तशी अपीलकर्ता यांची तक्रार आल्यास सचिव तथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.506–508

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 17/2008.**

श्री प्रमोद नामदेवराव लकडे
रानडे प्लॉट, रामनगर वर्धा 442001
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एन. मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती सेलू
ता. सेलू जि. वर्धा
2) श्री डी. ए. उईके
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी
पंचायत समिती सेलू
ता. सेलू जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2007 रोजी माहिती अधिकारी पंचायत समिती सेलू जि. वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

प्रा.आ.केंद्राच्या आस्थापनेवर असलेल्या प्रत्येक कर्मचा–याचे 1. पगार बिल 2. प्रत्येक कर्मचा–याचे प्रवास भत्ता देयके 3. प्रत्येक कर्मचा–याच्या दौरा दैनंदिनी 4. प्रा.आ.केंद्राचे खर्चासाठी आलेले अनुदान व अनुदानातून खर्च केलेल्या साहित्याची यादी व वस्तू खरेदी केलेली बील. 5. प्रा.आ.केंद्रात भाडे तत्वावर देण्यात आलेल्या झालेला दरमहा खर्च (देयके व लॉगबुक) वरील सर्व महिती प्रा.आ.केंद्राने पंचायत समितीकडे दिलेल्या देयकाची एक प्रत असावी.

सदरची माहिती मी समक्ष येवून घेवून जाईन असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 11.10.2007 रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये गट विकास अधिकारी दि. 18.10.2007 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रचे वैद्यकीय अधिकारी यांना पत्र देवून अपीलकर्ता यांना आपल्या स्तरावर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दि. 13.11.2007 रोजी अशाच प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर यांचे जन माहिती अधिकारी हे अपीलकर्ता अर्जदारच आहे. व तसेच जी माहिती त्यांनी मागितलेली आहे ती प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर येथेच उपलब्ध आहे. वेतन देयके ही प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर येथेच तयार केले जातात व मंजुरीसाठी पंचायत समिती येथे येते. त्यामुळे माहिती ही प्राथमिक आरोग्य

केंद्र हमदापूर येथेच उपलब्ध आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते स्वतः जरी माहिती अधिकारी असले तरी ज्या कर्मचा–याच्या कब्ज्यामध्ये सदरची देयके आहेत ते कर्मचारी त्यांना देयकाची माहिती देत नाही. संबंधित अधिकारी यांनी सुध्दा त्यांनी ब–याच पत्राच्याद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले होते तरी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु होती व त्या विभागीय चौकशीच्या मध्ये वेतन देयकाच्या संदर्भात त्यांना पुरावा म्हणुन दाखल करावयाची होती. परंतु उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांना चौकशी मध्ये पुरावा म्हणुन दाखल करता आला नाही. गट विकास अधिकारी यांचे पत्राच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर यांनी दि. 26.11.2007 रोजी श्री लकडे माहिती अधिकारी यांना एक पत्र दिलेले दिसून येते. त्या पत्रामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उल्लेख केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा आधार घ्यावा लागलेला आहे. पुन्हा दि. 29.11.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी माहिती अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी आदेश दिलेले दिसून येते.

4. अपीलकर्ता अर्जदार हे स्वतः जरी माहिती अधिकारी असले तरी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ कर्मचारी व वरीष्ठ अधिकारी जर त्यांची तक्रार ऐकुन घेत नसतील तर ती गंभीर बाब आहे. त्याबाबत तत्कालीन वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर हे जबाबदार आहेत असाही निष्कर्ष काढावा लागतो. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर हे जर त्या केंद्राचे प्रमुख आहेत व त्यांचे कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी यांचे तक्रारीचे निवारण करु शकत नाही याचा अर्थ ते अकार्यक्षम आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी हे सांगण्यापेक्षा त्याबाबतची माहिती घेवून तो प्रश्न सोडविल्यास अशा प्रकारचा प्रसंग येणार नाही. असे

असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध झाली नसल्यामुळे तसेच वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर यांना वेळोवेळी गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर हे दोषी आढळुन येतात व त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यास हरकत नाही तरीसुध्दा त्यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे ही आवश्यक राहिल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.9.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर यांना माहिती अधिकारी समजून त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी उपलब्ध करुन न दिल्यास ते शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र हमदापूर ता. सेलु जि. वर्धा यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 168/2008 व 169/2008.**

ले. कर्नल श्रीकांत यशवंत काणे

112 बी, शिवाजीनगर नागपूर ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अब्दुल मलीक

जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती दिग्रस

ता. दिग्रस जि. यवतमाळ ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांच्या दिनांक 21.10.2008 रोजीची तक्रार ही जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशाप्रमाणे खारीज करण्यात आली होती. तरीसुध्दा पुन्हा तक्रारदार यांनी तक्रार दाखल केल्यामुळे व त्यात त्यांनी स्पष्टपणे दिलेले असल्यामुळे त्यांना 1994 नंतरच्या मंजुर प्रकरणाची माहिती एवढीच अपेक्षित असल्यामुळे सदरच्या तक्रारीचा पुर्नविचार करण्यात आला होता. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी 1994 नंतरची नवीन प्रकरणे मंजुर झालेली आहे त्या प्रकरणाची यादी व सेवेत रुजू होण्याची तारीख व सेवेतून निवृत्त होण्याची यादी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार

ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे. तसेच तक्रारदार यांनी 2000 व 2007 करीता दिग्रस वाई (लिंगी) येथील उभारण्यात येणा–या घर टॅक्स बद्यलची माहिती ही मागितलेली असून सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 60 दिवसाचे आंत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रार क्रमांक 168/2008 व 169/2008 ही मंजुर करण्यात येत असून कर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रार क्रमांक 168/2008 मधील माहिती ही 10 दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी व 169/2008 मधील माहिती ही 60 दिवसाचे आत तक्रारदार यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.513–514

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 25/2008.**

ॲड. रीना नौकरकर

प्लॉट नं. 93, प्रगती हा>सींग सोसायटी,

पावनभुमी सोमलवाडा, वर्धा रोड, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अति. अपायुक्त – 1

महानगर पालिका नागपूर

2) श्री संजय जयस्वाल

जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग)

महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी विद्युत विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
विद्युत विभागातर्फे पथदीप देखरेखीकरीता खरीदी करण्यात आलेल्या साहित्यासंबंधी संपुर्ण माहिती मिळण्याबाबत. मे 2007 आणि जून 2007 मध्ये

1. Give the details of total material purchase in the month of May and June 07 for the streetlight maintenance.

2. Under which head you have purchased the material and what was the necessity of purchasing.

3. Give the "Work order" copy of the supply of material.

4. By which agency you have installed this material give the "Work order" copy issued to them.

5. List of restoration of lights with consumption of material.

6. Does the third party or technical auditor of NMC inspect the work? If not why? If yes give the detail report of the same.

7. Give the details of the stock in the store as well as in Zonal stores of NMC lighting department up to 30$^{th}$ of June.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.8.2007 रोजी 6 मुद्यांच्या संदर्भात माहिती देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न

झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 20.9.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19. 10.2007 रोजी देण्यात आलेला असून निर्णय झाल्यापासून 8 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी परंतु अपीलार्थीला माहिती दिलेली दिसून येत नाही त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये 6 मुद्यांवर माहिती मिळाली परंतु विलंबाने मिळाली तसेच 7 व्या मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांच्या जोडपत्रातील मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये म्हणजे मे आणि जुन 2007 या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येत असल्यामुळे व त्या कालावधीत कोणत्याही प्रकारची वर्क ऑर्डर दिलेली नसल्यामुळे 7 व्या मुद्याच्या संदर्भात माहिती असल्यामुळे दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी जोडपत्रात उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भामध्ये अवलोकन केले असता असे दिसून येते की "month of May and June 07" व त्याबाबतचा विचार केल्यास मुद्या क्र. 7 ची माहिती बरोबर आहे असा निष्कर्ष काढता येतो परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मुळ अर्जामध्ये माहितीचा कालावधी मे आणि जुन 07 असा दिलेला आहे परंतु अपीलकर्ता यांनी सुध्दा माहितीचा अर्ज करतांना योग्य ते नेमके वर्णन केल्यास अशा प्रकारचा गैरसमज करणचे कारण नाही तसेच माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती त्यांना तयार करुन द्यावी लागली व त्यामुळे विलंब झालेला आहे. परंतु असे असले तरी माहिती ही 30 दिवसाचे आंत तयार करुन ठेवणे हे अपेक्षित असते. अपीलकर्ता यांनीसुध्दा व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे स्वतः व्यक्तीशः 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क

साधून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते व त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन न दिल्यास हरकत घेणारे पत्र हे माहिती अधिकारी यांचेकडे देणे आवश्यक असते. अपीलकर्ता माहिती घेण्यास गेले होते व माहिती अधिकारी सांगणार अपीलकर्ता माहिती घेण्यास आले नाही यातून कोणताही निर्णय होवू शकत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरसुध्दा माहिती मात्र 8 दिवसाचे आंत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यातून सुध्दा माहिती तयार करण्यास विलंब झाला असे त्यांचे म्हणणे आहे. माहिती ज्या साहित्याच्या स्वरुपात उपलब्ध असेल उदा. कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज टिपण्या निर्णय इत्याादिच्या स्वरुपात असल्यास त्यांच्या छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे असा ''माहितीचा अधिकार'' आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 7 ची माहिती साठा नोंदवहीच्या छायांकित प्रती तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयातील माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.7.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तीशः साठा नोंदवहीतील संबंधीत कालावधीतील छायांकीत प्रती तसेच विभागीय कार्यालयातील छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.515–519

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 35/2008.**

श्री सतीश विशनदास टहलरामानी
प्लॉट नं. 146, आहूजा निवास के पास
जरीपटका, नागपूर 14. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग 1 (उच्च श्रेणी)
90 जुनघरे निवास, शिवाजी नगर नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक वर्ग 2
नागपूर शहर क. 5
रघुजी नगर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2007 रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग 2 यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

पावर ऑफ अटरनीची सर्टीफाईड कापी नियमप्रमाणे

काशीबाई मिश्रा व मानेज मोरयानी केबीज प्लाट नं. 687 के बाबत हुई 2005 मे हुई पावर ऑफ अटरनीची कापी सर्टीफाईड.

सदरची माहिती स्वतः घेवून जावू असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दिनांक 11.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.11.2007 रोजी नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 57 (3) नुसार व नोंदणी आदेश संहिता भाग 2 मधील आदेश संहिता क्र. 496 प्रमाणे पुस्तक क्र. 4 मधील व त्याच्याशी संबंधित अनुक्रमणिकेमधील नोंदीच्या नकला अनुक्रमे ज्याच्याशी त्या निर्दिष्ट आहे अशा दस्तऐवजांचे निष्पादन करणा–या किंवा त्याच्या अधीन दावा सांगणा–या कोणत्याही व्यक्तीस किंवा त्यांच्या अभिकत्यास किंवा प्रतिनिधीस देण्यात येतील इतरांना नाही. तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 8 (छ) चे उल्लंघन करता येत नाही. सबब सदर माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग 1 यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 8 (छ) चा घेतलेला आधार हा त्यांच्या नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 57 (3)

तरतुदीच्या तसेच आदेश संहिता 496 च्या तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात घेतलेला आहे व तो योग्य आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व अपीलकर्ता यांना सदरच्या माहितीचा न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यकता असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याकरीता अधिनियम च्या कलम 11 (1) प्रमाणे ज्यांच्या संदर्भात ती माहिती आहे त्यांना विचारणा करणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित व्यक्तींना अधिनियम च्या कलम 11 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही असे विचारणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 31.10.2007 च्या अर्जात मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 11 (1) प्रमाणे संबंधित व्यक्तीला माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विचारणा करण्यात यावी व त्याप्रमाणे निर्णय घेवून अपीलकर्ता अर्जदार यांना कळविण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.520–522

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 33/2008 व 34/2008.**

सौ. इंदू कैलाश शहारे
41, गुरुकुंज कॉलोनी, इंद्रलोक सभागृहाचे मागे
विद्यानगर, भंडारा ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त
नगर पालिका प्रशासन नागपूर
2) श्री मेश्राम
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपील क्र. 33/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.12.2006 रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माझे दि. 19.10.06 व 8.7.06 मधील प्रार्थनेवर झालेल्या कार्यवाहीची माहिती.

2. सदर प्रकरणी अतिक्रमण कर्त्यावर कोणतीही कार्यवाही न करता पर्यायाने अतिक्रमण कर्त्यास महाराष्ट्र रिजनल टा>न प्लॅनींग ॲक्ट भारतीय दंड संहिता अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम 1989 चे सर्रास उल्लंघन करुन नैतिक पाठबळ व सहकार्य करणा–या दोषी अधिका–यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती.

सदरचा अर्ज ही माहिती नगर परिषदेकडे असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी नगर परिषदेकडे दि. 4.1.2007 रोजी हस्तांतरीत केलेला दिसून येतो. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.2.2007 रोजी नस्ती पाहुन माहिती करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. मात्र विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.10.2007 रोजी आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 28.11.2007 रोजी अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप तक्रार स्वरुपाचे असले तरी अपीलार्थीचे दि. 8.7.2006 व 19.10.2006 चे निवेदनाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. त्यामुळे या प्रकरणात दोषीवर कारवाई केली असल्यास तसे अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते. तसेच कारवाई केलेली नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविणे अपेक्षित आहे. परंतु याबाबत मुख्याधिकारी यांनी अपिलार्थीस काहीही कळविलेले नाही. त्यामुळे प्रतिवादींनी अपिलार्थीस हा आदेश प्राप्त झााल्यापासून 7 दिवसाचे आंत संबंधित प्रकरणाची संपूर्ण नस्ती अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचा पुन्हा दि. 16.4.2007 चा अर्ज दिसून येतो व त्यावर दि. 14.8.07 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या

निर्णयाप्रमाणे वर नमुद केल्याप्रमाणे दि. 17.12.2007, 29.12.2007 व 18.2.2007 रोजी कार्यालयीन वेळेत स्वतः उपस्थित राहुन नस्ती तपासून माहिती प्राप्त करुन घेतली होती. भारनियमनामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही व त्यानंतर ती त्यांनी पुन्हा उपस्थित राहुन करावी असे कळविण्यात आलेले होते. त्यानंतर ते कार्यालयात उपस्थित झालेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

3. अपील क. 34/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2007 रोजी खालीलप्रमाणे माहिती ही मुख्याधिकारी तथा नगर परिषद भंडारा यांचेकडे मागितलेली दिसून येते.

1. आपले घरबांधकामाचे परवानगीचे आदेश क. 10/26/पीडब्लूडी/04 दि.1.1.2005 मधील अट क. 1 ते 11 पैकी किती अटीचे सर्रास उल्लंघन झाले आहे.

2. अटीशर्तीचे उल्लंघन झाले असल्यास दि.1.1.2005 चे आदेशातील क. 1 ते 11 अटीशर्तीचे अधीन राहुन कोणती कार्यवाही करण्यात आली त्यांच्या छायांकीत प्रती.

3. अटीशर्तीचे उल्लंघन होवूनही व सदर बाब न.प.प्रशासनास वारंवार कळवुनही दि.1.1. 2005चे आदेशातील अटीशर्तीप्रमाणे कार्यवाही न करण्याची कारणे लाच घेवुन कि रस्त्याची जागा स्थानिक बाजारभावाने हस्तांतरीत केली असल्याने कि शासकिय/सामाजिक/जातीय झुंडशाहीचे दबावाखाली.

अपीलकर्ता यांनी अपील क. 33/2008 मध्ये सुध्दा त्याच संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या दि. 16.4.2007 च्या अर्जामध्ये व अपील क. 33/2008 मधील अर्ज दि. 29.12.2006 ची कार्यवाही ही एकच आहे असे दिसून येते. प्रथम अपील दि. 26.10.2007 रोजी दाखल करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 28.11.2007 रोजी देण्यात आलेला असून हा निर्णय प्राप्त झाल्यापासून 7 दिवसाचे आंत संबंधित प्रकरणाची संपूर्ण नस्ती अपीलकर्त्यास अवलोकनार्थ उपलब्ध

करुन द्यावी व त्यानंतर अपीलार्थीनी मागणी केलेली माहीती विहित शुल्क आकारुन त्यांना द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. दि. 14.8.2007 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 33/2008 व अपील क्र. 34/2008 मधील अपीलकर्ता यांचा माहितीचा विषय एकच असल्यामुळे व त्यावर माहितीसुध्दा उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना नस्तीचे अवलोकन करण्याच्या संदर्भामध्ये आदेश दिलेले असल्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी नस्तीचे अवलोकन केलेले आहे परंतु त्यानंतर पुन्हा नस्तीचे अवलोकन करण्यास अपीलकर्ता हे आलेले नसल्यामुळे व तसे त्यांना दि. 18.2. 2007 च्या पत्राप्रमाणे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.523–526

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 26/2008, 27/2008 व 28/2008.**

श्री भास्कर मिठुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड, गोंदिया (पंचशिल झेंडयाजवळ)
ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष दीक्षा भूमी शिक्षण संस्था वरठी
सनफ्लॅग पेट्रोल पंपाजवळ वरठी (भंडारा रोड)
ता. मोहाडी जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव दीक्षा भूमी शिक्षण संस्था वरठी
सनफ्लॅग पेट्रोल पंपाजवळ वरठी (भंडारा रोड)
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी आणि त्यांचे तर्फे श्री नितीन खांबोरकर हे वकील सकाळी

11.00 वा. हजर होते. परंतु त्यांनी खुलासा देण्यास मुदत मागितली होती. वास्तविक आयोगाचे नोटिसीमध्ये संपूर्ण आवश्यक त्या बाबी संदर्भात सुचना दिलेल्या आहेत. परंतु त्यातही सुचनांचे पालन हे जन माहिती अधिकारी यांनी करावयाचे आहे व वकीलाच्या माध्यमातून खुलाशा करीता तारीख मागणे उचित नाही. दीक्षा भूमी शिक्षण संस्था ही खाजगी अनुदानीत संस्था आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांची आहे. तीनही अपीलांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे वकीलाचा खुलाशासाठी मुदत मागण्याचा अर्ज नाकारण्यात आलेला असून त्यांना खुलासा देण्यासाठी दु. 4.00 वाजताची वेळ देण्यात आलेली होती. परंतु 4.00 वाजेपर्यंत सुध्दा कोणत्याही प्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी किंवा त्यांचे वकील यांनी दिलेला नाही किंवा ते हजरही झालेले नाही व म्हणून सदरच्या अपीलामध्ये एकतर्फी निर्णय देण्यात येत आहे. परंतु आता निर्णय देत असतांना खुलासा दाखल करण्यात आलेला आहे.

2. अपील क्र. 26/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून सचिव दीक्षा भूमी शिक्षण संस्था वरठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Home Address : Kasturba Ward (Near Panchasheela Zanda) Gondia Post Gondia Tah. Distt. Gondia 441601

Office Address : Kasturba Ward (Near Panchasheela Zanda) Gondia Post Gondia Tah. Distt. Gondia 441601

"Dr. Ambedkar Vidyalaya Surya Tola Road Gondia certified Xerox copies of employees attendance Register Last page of Each month.

The period to which the information relates : 1st September 2003 to February 2007.

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने किंवा कुरीअर सर्व्हीसने घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2007 रोजी अध्यक्ष ऑल इंडिया शिक्षण एन्टीकरप्शन ऑर्गनायझेशन या संस्थेच्या संदर्भात खुलासा स्पष्ट करावा अशी विचारणा केलेली दिसून येते. त्यानंतर सुध्दा दि. 29.10.2007 रोजी अपीलकर्ता यांनी खुलासा केल्यानंतर केलेली माहिती प्राप्त झाल्यानंतर संस्थेला पुढिल निर्णय घेता येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 11.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दि. 4.12.2007 रोजी देण्यात आलेला असून मागितलेली माहिती आपणास कशा करीता हवी आहे याचा उल्लेख आपल्या पत्राात नसल्यामुळे जोपर्यंत याप्रकरणाचा संपूर्ण खुलासा आपणाकडून होत नाही तोपर्यंत आपण मागितलेली माहिती आपणास देता येत नाही असे दिक्षाभूमी शिक्षण संस्था यांनी कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अपीलात उत्तरवादी यांनी खालील खुलासा दाखल केलेला आहे.

1) The respondent has not receive the application dt. 28.9.2007 still, the information demanded at Sr.No. 1, 2 & 4 resp. is already supplied to him. And so far as the Sr.No.3 one employee Shri K.C.Satpute filed the writ petition no. 5581/07 (STC No. 54.07) and this attendance Book is subject matter in said petition. The original attendance book is with the counsel and hence the society could not give the said record.

2) The appellant is outsider and third person. And the information could not be supplied to him. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 27/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून सचिव दीक्षा भूमी शिक्षण संस्था वरठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"Dr. Ambedkar Vidyalaya Surya Tola Road Gondia

1. Appointment order matter of clerk Ku. Satdeve

2. Written statement (Reply) submitted by Secretary D.S.S. Warthi to Presiding Officer School Tribunal Chauchrapur in Petition No. 17/2006 (3) Muster Roll Sept 2003 of Br.School (Shastri Ward Gondia) and Main Branch Gondia. Sept. 2003 to Sept. 2007.

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने किंवा कुरीअर सर्व्हीसने घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 4.12.2007 रोजी अध्यक्ष दिक्षाभूमी शिक्षण संस्था यांनी आपणास कशा करीता हवी आहे याचा उल्लेख आपल्या पत्राात नसल्यामुळे जोपर्यंत याप्रकरणाचा संपूर्ण खुलासा आपणाकडून होत नाही तोपर्यंत आपण मागितलेली माहिती आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्रााचा दि. 8.12.2007 रोजी खुलासा दिलेला आहे व तरीसुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

1) That, the appellant is outsider and third person and has no connection with the affairs and administration of society and school. The information called by the appellant is to third person and hence the respondent inform the concern person abount the information called by the appellant and the same was pertaining to Ku. Savita Satdive. The respondent as per letter dt. 30.9-2007 inform Ku. Savita Satdive on 3.10.07 and on the said letter Ku. Savita Satdive refuled to handover the document to Shri Dongare as the same is personal and confidential. Thereafter the respondent received the notice of Education Officer. But again appellant sent more application the respondent for calling of information and respondent has given all the information to him subsequently.

2) That since the information was related to third person who has denied the same. Hence the said information could not be given to the appellant.

3) The applicant has habit to issue the letter and he has issued the later more than 100 School and most of the information called by him is already supplied to him. And therefore the appeal filed by

this appellant needs no intervention. It is further informed that the appellant himself gone letter to the respondent not to give an information as per letter of E.O. named Bhaskar and hence that was ot supplied.

The appellant can collect the information from E.O. who directed the respondent to supply the information. But the appellant himself to refused to accept the same and all this information supplied to him on 4.7.2008 and therefore nothing survive in this appeal now. खुलाशावरुल ही माहिती तृतीय पक्षाची असली तरी ती कार्यालयीन प्रशासकीय अभिलेखाचा भाग असल्याने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 28/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून सचिव दीक्षा भूमी शिक्षण संस्था वरठी यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. Certified Xerox copy of appointment order issued by I.S.Sakhare H.M. w.e.f. 1.9.2003

ii. Certified Xerox copy of revised appointment order issued by N.D.Bhautik H.M.in 2004.

iii. Certified Xerox copy of Termination order issued by N.D.Bhautik H.M. in 18.5.2006

iv. Certified Xerox copy of letter issued to N.D.Bhautik H.M.by Vasantrao Humne President. Termination of Vivek Rokde

v. Fresh appointment order issued by Secretary/President of D.S.S. Warthi after withdrawal of case from School Tribulal Chandrapur in the year 2007.

vi. Certified Xerox copy of appointment letter issued by E.O.(Sec) Z.P.Gondia in the Session 2007-08 or before.

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने किंवा कुरीअर सव्हीसने घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 4.12.2007 रोजी माहिती आपणास कशा करीता हवी आहे याचा उल्लेख आपल्या पत्राात नसल्यामुळे जोपर्यंत याप्रकरणाचा संपूर्ण खुलासा आपणाकडून होत नाही तोपर्यंत आपण मागितलेली माहिती आपणास देता येत नाही असे अध्यक्ष दिक्षाभूमी शिक्षण संस्था यांनी कळविलेले दिसून येते. व त्याबाबत दि. 8.12.2007 रोजी अपीलकर्ता यांनी खुलासा केलेला आहे दिसून येतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

5. अपीलकर्ता यांच्या तीनही अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या ऑल इंडिया एन्टीकरप्शन शिक्षण संस्था या संस्थेबद्यल स्पष्टीकरण विचारलेले आहे तसेच अध्यक्ष दीक्षा भूमी शिक्षण संस्था यांनीसुध्दा माहिती कशाकरीता हवी आहे याबद्यलचे स्पष्टीकरण प्रथम अपीलाच्या संदर्भातून विचारलेले आहे.

अधिनियमाच्या कलम 6 (2) प्रमाणे माहिती मिळण्याच्या विचाराने करणा–या अर्जदारास माहिती विषयाने करण्याचे कोणतेही कारण देण्याचा त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी कसा असेल त्याखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती माहिती देण्यास भाग पाडण्यात येणार नाही असे नमुद केलेले आहे व त्यामुळे अर्जदारास माहिती कशाकरीता हवी आहे असे विचारता येत नाही तसेच त्यांच्या संस्थेबद्यल कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरणसुध्दा विचारता येत नाही आणि त्याकारणास्तव माहितीसुध्दा नाकारता येत नाही. परंतु सदरच्या तीनही अपीलामध्ये संस्थेच्या जन माहिती अधिकारी तसेच अध्यक्षांनी माहिती कशाकरीता हवी आहे असे विचारलेले दिसून येते व ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. यावरुन अपीलकर्ता यांचे तीनही अर्जातील मागितलेली माहिती ही देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा प्रयत्न आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्या दृष्टीने सचिव तथा माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. तसेच अध्यक्ष यांनीसुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय योग्यरित्या दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते अशा संस्थेच्यावर उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. व त्यामुळे वरील तीनही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहे.

6. असे असले तरी अपीलकर्ता यांनी आयोगापुढील अपील मेमो मध्ये प्रतिज्ञापत्र सादर करतांना ‘‘अध्यक्ष ऑल इंडिया एज्युकेशन – ॲन्टी करप्शन ऑर्गनायझेशन’’ असे नमूद केलेले आहे. त्यामुळे अशा प्रकारची शासकीय अधिकृत संघटना आहे किंवा नाही याबाबतची चौकशी ही मा. शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी करुन त्याप्रमाणे अहवाल सादर करावा जेणेकरुन माहितीच्या अधिकाराचा गैरवापर होत असेल तर असे अर्ज खारीज करणे आवश्यक होईल. सदरची चौकशी पोलीस ॲन्टी करप्शन ब्युरोकडेसुध्दा करणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक अपील क्र. 26/2008, अपील क्र. 27/2008 व अपील क्र. 28/2008 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 29.9.2007, 28.8.2007 व 27.9.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.523–531

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2559/2007.**

ॲड. कौस्तुभ उत्तमराव फुले
डॉ. फुले स्मृती निवास, बुध्द नगर,
युनिट नं. 2, नागपूर 17. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राध्यापक व विभाग प्रमुख
न्यायवैद्यक शास्त्र विभाग
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडीकल चौक) नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
प्राध्यापक व विभाग प्रमुख
न्यायवैद्यक शास्त्र विभाग
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडीकल चौक) नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरचे द्वितीय अपील हे दि. 10.9.2007 रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या दि. 3.10.2007 च्या अपीलीय अधिकारी तथा प्राध्यापक विभाग प्रमुख यांचे निर्णयाचे विरुध्द दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी राज्य

माहिती आयोगाकडे दि. 16.11.2007 रोजी दि. 30.8.2007 च्या अर्जाच्या संदर्भात तक्रार सुध्दा दाखल केलेली होती. अपीलकर्ता यांची तक्रार ही दि. 7.10.2008 रोजी खारीज करण्यात आलेली आहे. व त्यामुळे दि. 30.8.2007 च्या अर्जा संदर्भातील प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द जे द्वितीय अपील आहे तेसुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपीलातील मुळ अर्ज दि. 30.8.2007 रोजीच्या संदर्भात दाखल केलेल्या दि. 16.11.2007 च्या तक्रारीचा निर्णय हा दि. 7.10.2008 रोजी देवून तक्रार खारीज केली असल्यामुळे अपीलसुध्दा खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 25.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.533–534

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 37/2008.**

सौ. वनिता एकनाथराव ढोक
89 वेणुवन सोसायटी (फ्रेन्डस कॉलनी)
काटोल रोड, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रामदास आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर
2) श्री गुलाब टेकाडे
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क. 1,
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.8.2007 रोजी शिरस्तेदार नगर भूमापन अधिकारी क्र. 1, नागपूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दि. 22.7.2003 रोजी वारसान फेरफार कोणता अर्ज व शपथपत्रानुसार झाला.

दि. 1.6.2003 ते 22.7.2003 भुमापन क्र. 225, 140 श्री जगन्नाथ विठोबा भेंडे यांच्या मृत्युनंतर वारसदारांची नावे कोणत्या अर्ज व शपथपत्रानुसार झाली त्याची माहिती व प्रती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.10.2007 रोजी सदर प्रकरणाची पाहणी केली असता वरील प्रकरण मिळाले नसल्यामुळे अभिलेखापाल यांनी लेखी लिहून दिल्याने सदर प्रकरणाची नक्कल आपणास पुरविता येणार नाही करीता आपणास लेखी लिहुन देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दि. 31.8.2007 रोजी सुनावणीच्या करीता दि. 6.11.2007 रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसते. अपीलाचा निर्णय हा दि. 10.12.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचा अर्ज मान्य करण्यात आलेला आहे. अपीलदार यांनी मागणी केलेले कागदपत्र उदा. अर्जदाराचा नामांतरणाचा अर्ज, व शपथपत्र शोध घेवून एक महिन्यात देण्याची कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 11.1.2008 रोजी नगर भूमापन अधिकारी क्र. 1, नागपूर यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आज अपीलकर्ता सुनावणीस हजर नाही परंतु त्यानंतर भूमी अभिलेख नागपूर यांनी असे सांगितले की सदर प्रकरणाची नस्ती ही आता मिळालेली आहे व त्यामुळे

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. आतापर्यंत शोध घेवून सुध्दा नस्ती उपलब्ध झाली नव्हती व माहिती देता आली नाही असे त्यांनी सांगितले. असे असल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 31.8.2007 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.535–537

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 36/2007.**

श्री मनोज मोतीराम रंगारी

136, धम्मकिर्तीनगर, दत्तवाडी, वाडी,

नागपूर 23. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षण उपसंचालक

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर

2) श्री पाटील

जन माहिती अधिकारी तथा

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.8.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

श्री सुनील मोतीराम रंगारी तबलजी शासकिय अध्यापक विद्यालय बाबुपेठ चंद्रपूर यांचा दि. 20.1.2007 चा योग्य मार्गाने केलेला बदली बाबत अर्ज.

1. माझे भा> सुनील मोतीराम रंगारी 60 टक्के शारिरीक अपंग असून सध्या ते चंद्रपूर येथील शा.अ.विद्यालयात कार्यरत आहेत. त्याच्या 20.1.2007 च्या बदलीबाबतच्या अर्जाबाबत शिक्षण उपसंचालक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत मला अवगत करावे.

2. शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या बदलीबाबत शासनाला पाठविलेल्या पत्रव्यवहाराची प्रत यांनी उपलब्ध करुन दयावी.

3. शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या बदलीबाबत संबंधित प्राधिकरणाकडे कार्यवाहीबाबत पाठविलेल्या पत्रव्यवहाराची प्रत व बदलीच्या प्रस्तावाची प्रत उपलब्ध करुन दयावी.

सदर माहिती अपंग व्यक्तीशी संबंधित आहे. अपंग नागरिकाच्या गरजा लक्षात घेवून माहितीच्या अधिकारात अपंग नागरीकाची विशेष दखल घेण्यात येते व त्यांना सुविधा देण्याबाबत प्रावधान आहे.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2007 रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 17.10.2007 रोजी प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 26.8.2007 चे अर्जान्वये मागितलेली माहिती या कार्यालयाने देण्यास नकार दिलेला नसून नियम क. 7 नुसार या कार्यालयाचे पत्र क्र. आस्था/क./रंगारी/15471/07 दि. 30.8.2007 अन्वये रु. 36/– एवढी रक्कम चलानाद्वारे जमा करण्याचे निर्देश देवून चालानाची छायांकीत प्रत या कार्यालयास सादर करण्यास कळविण्यात आलेले होते. चालानाची छायांकीत प्रत प्राप्त न झाल्यामुळे दि. 29.9.2007 चे पत्रान्वये स्मरणपत्र देण्यात आलेले होते. तरी देखील आपण चालानाची प्रत सादर न

करता या कार्यालयास अपिल दाखल केलेले आहे असे शिक्षण उपसंचालक यांनी कळविलेले दिसून येते. असे असले तरी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केलेला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 28.8.2007 च्या अर्जाप्रमाणे दि. 30.8.2007 रोजी अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात दिलेल्या पत्यावर एकुण रु. 36/- ही रक्कम चालानद्वारे खालील लेखाशिर्षात भरण्यात यावी व चालानाची प्रत तात्काळ या कार्यालयास सादर करावी असे हस्तलिखीत पत्र दिलेले होते. परंतु त्याप्रमाणे अतिरिक्त खर्चाच्या रकमेचा भरणा केला नाही म्हणून त्यांना दि. 29.9.07 रोजी स्मरणपत्र दिलेले होते. त्यावर सदरचे स्मरणपत्र हे संगणकावर तयार केले आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. संगणकावर तयार करतांना त्यावर 1.10.07 अशी तारीख घातलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी 1.10.07 रोजी प्रथम अपील दाखल केले नंतर सदरचे स्मरणपत्र तयार करण्यात आलेले असून त्यावर 29.9.07 ही तारीख दिलेली आहे व त्यामुळे सदरचे दि. 30.8.2007 चे पत्र हे बनावट आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो. व ते पत्र अपीलकर्ता यांना मिळालेले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे दिसून येते व त्याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.8.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) शिस्तभंगाची कार्यवाही ही विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी करावयाची असून त्याकरीता त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.535–538